दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे
*(आष्टी) वर्धा *मंगळवार, १५ सप्टेंबर २०२६ *वर्ष ४ थे *अंक २२६ *पृष्ठ ६ *मुल्य ५.०० RNI No.: MAHAR/2022/82242

मुलासह आईला मारहाण, तीन जणांवर गुन्हा दाखल

वर्धा : मुलासह आईला मारहाण केल्याची घटना गणेशपूर येथे घडली. याप्रकरणी तीन जणांविरोधात समुद्रपूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.
समुद्रपूर तालुक्यातील गणेशपूर येथील कन्हैया पंडित खडसे (वय २७) गावातील चौकात असताना आदित्य उर्फ बंटी कुरसंगे याने काठीने मारहाण केली. मागाहून त्याच्या आईवडिलांनी येऊन पकडून ठेवत बंटीने मारहाण केली. यावेळी कन्हैयाची आई मारहाण करण्याबाबत विचारणा केली असता बंटी खुडसंगे याने त्यांनाही मारहाण केली. यामध्ये कन्हैया खडसे, मालू खडसे हे जखमी झाले. त्यांना समुद्रपूर येथील रुग्णालयात उपचारार्थ नेण्यात आले. याप्रकरणी तक्रारीवरून आदित्य उर्फ बंटी अरवींद कुरसंगे, परवीन खुरसंगे, शालू अरवींद खुरसंगे या तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल. पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.





ढोल-ताशाच्या निनादात गणराय विराजमान : भाविकांमध्ये प्रचंड उत्साह

वर्धा, ता. १४ : गणपती बाप्पा मोरया... मंगलमूर्ती मोरया... एक-दोन, तीन चार गणपतीचा जयजयकार, असा जयघोष आणि ढोल ताशांच्या निनादात सोमवारी (ता. १४)घरोघरी बुद्धीची देवता गणरायाचे आगमन झाले.

घरोघरी आणि सार्वजनिक गणेश मंडळात एकदंत, विघ्नहर्ता गणरायाचा जिल्ह्यात यंदा १२ दिवसांचा मुक्काम आहे. घरोघरी आणि सार्वजनिक गणेश मंडळांत विधिवत पूजा करून गणरायाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. लाडक्या गणरायाला घरी नेण्यासाठी सोमंवारी सकाळपासूनच गणेशभक्तांनी मगनवाडी परिसर, छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर, आर्वी नाका, प्रमुख मार्ग, गोंड प्लॉट, सिंदी (मेघे) आदी ठिकाणी गर्दी केली होती. लाडक्या गणरायाची मूर्ती खरेदी केल्यानंतर 'मंगलमूर्ती मोरया' असा जयघोष करीत कुणी कारमध्ये, तर कुणी दुचाकी वाहनावर नेत होते. गणपतीच्या मूर्तीसोबत मूषक, जाणवे, गोफ आदी पूजेचे साहित्य खरेदी केले जात होते. यावर्षी बाजारपेठेत अन्य जिल्ह्यातील मूर्तिकार मोठ्या प्रमाणात दाखल झाल्याने स्थानिक मूर्तिकारांची अडचण झालेली दिसून आली. मगनवाडी परिसरात मूर्ती नेण्यासाठी भक्तांची गर्दी झाल्यामुळे त्या परिसरातील मार्ग वाहतुकीकरिता बंद करण्यात आला होता. शहरातील काही भागात सार्वजनिक गणेश मंडळात विविध देखावे साकारले जात आहेत. देखाव्यावर अंतिम हात फिरविण्यासाठी कारागिरांची धावपळ सुरू होती. गणरायाच्या विधिवत प्राणप्रतिष्ठेसाठी लागणारे साहित्य केळीचे खांब, कमळ, केवडा, दुर्वा, शमीपत्र, पाट, वस्त्र खरेदी करण्यासाठी बाजारपेठेत प्रचंड गर्दी उसळली होती. मिष्ठान्न भंडारमध्ये पेढे, मोदक घेण्यासाठी गणेशभक्तांनी मोठी गर्दी केली होती. गणेशोत्सवासाठी काही मिष्ठान्न भंडारने खोवा, पेढा, खोबऱ्याचे मोदक तयार केले होते. या मोदकांना चांगली मागणी होताना दिसून आली. लाडक्या गणरायाच्या आगमनामुळे सर्वत्र उत्साह संचारलेला असतो. याच उत्सवामुळे अनेक हातांना रोजगारही उपलब्ध होतो. केळीचे खांब, दुर्वा, शमीपत्र, बेलपत्र, जाणवे, कमळ फुले, आदी पूजा साहित्याची विक्री करून अनेक हातांना हंगामी का होईना; पण रोजगार उपलब्ध झाला. या व्यवसायाच्या मिळकतीतूनच अनेक घरच्या चुली पेटतात. गणेशोत्सवात अनेकांकडून हार, फुलांची मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्यात येते. या काळात दुकानांत हार, फुलांच्या किमती वाढल्या असल्या तरी येथे नागरिकांची मोठी गर्दी झाली होती.

अनेकांच्या हाताला हंगामी रोजगार

गणेशोत्सव म्हणजे चैतन्याचा सोहळा. या उत्सवानिमित्त सर्वत्र उत्साह संचारला असतानाच केळीचे खांब, फुले, जाणवे, शमीपत्र व इतर वस्तू विक्रीच्या माध्यमातून अनेकांच्या हाताला रोजगार उपलब्ध झाला. सकाळपासून साहित्य खरेदीसाठी गणेशभक्तांची लगबग पहायला मिळाली. पूजेकरिता लागणाऱ्या साहित्याची विक्री करण्यासाठी शहरालगतच्या ग्रामीण भागातील विक्रेते रात्रीपासूनच रस्त्याच्या कडेला मुक्कामी होते.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव

यंदा मूर्ती खरेदी करताना ती शाडू मातीचीच असावी याकडे गणेशभक्तांनी कटाक्षाने लक्ष दिले. सण-उत्सव साजरे करताना पर्यावरणाचे संरक्षण-संवर्धन व्हावे या अनुषंगाने मातीच्या मूर्ती खरेदी करण्यालाच पसंती दिलेली दिसून आली.

दानपेटी फोडून चोरी करणाऱ्या आरोपीस काही तासांत बेड्या

अल्लीपूर पोलिसांची कारवाई



वर्धा : मोझरी (शेकापूर) - दानपेटी फोडून चोरी करणाऱ्यास पोलिसांनी काही तासांत ताब्यात घेत अटक केलही. अल्लीपूर पोलिसांनी ही कारवाई केली.

अल्लीपूर येथील भवानी माता मंदिरामध्ये अज्ञात चोरट्याने शुक्रवारी रात्रीच्या दरम्यान दानपेटीचे कुलूप लोखंडी रॉडने तोडून दानपेटीतील रोख रक्कम घेऊन चोरटा पसार झाला. घटनेची माहिती सकाळी मंदिर कमिटीचे बजरंग खोंड, सुधाकर ढोबळे यांनी दिली. त्यावरून अल्लीपूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचा तपास ठाणेदार संगीता हेलोंढे यांच्या मार्गदर्शनात पीएसआय वर्षा तांदूळकर, सहाय्यक उपनिरीक्षक अजय रिठे व वानखेडे यांनी केला. बाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले आणि संशयित आढळून आला. पोलिसांनी वडकी वणी येथून शाहिद इशाद शेख रा. खापरखेडा हल्ली मुक्काम अल्लीपूर याला ताब्यात घेतले. तपासादरम्यान आरोपीकडून चोरी गेलेली पूर्ण रक्कम हस्तगत करण्यात आली. चौकशीत शाहीद शेख याने चोरीची कबुली दिली. पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

रोहणा येथे हिंस्त्र प्राण्याचा हल्ला, वासराचा मृत्यू

रोहणा - गजबजलेल्या लोकवस्तीला लागून असलेल्या एका गुराच्या गोठ्यात रात्रीच्या सुमारास हिंस्त्र प्राण्याने केलेल्या हल्ल्यात वासराचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दिलीप अवथळे यांच्या मालकीच्या गोठ्यात ही घटना घडली. नेहमीप्रमाणे पशुपालक सकाळी गोठ्यात गेले असता त्यांना या हल्ल्याची भीषण दृश्ये दिसून आली, ज्यामुळे गावात एकच खळबळ उडाली. गावालगतच्या इंदिरा भागात ही घटना घडल्याने ग्रामस्थांनी चिंता व्यक्त केली आहे. घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी डेहणकर यांनी तातडीने पथकासह घटनास्थळी भेट दिली आणि पंचनामा केला. यावेळी वनविभागामार्फत पशुपालकाला नियमानुसार आर्थिक मदत देण्याचे आश्वासन देण्यात आले.

भरती परीक्षा पद्धतीच्या सुधारणांसाठी उच्चस्तरीय समिती १६ सप्टेंबरला नागपुरात



नागपूर : भरती परीक्षा पद्धतीतील सुधारणांसाठी गठित करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीच्या नागपूर येथील संवाद कार्यक्रमाच्या अनुषंगाने समितीचे अध्यक्ष व सदस्य बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता नियोजन भवन, सदर पोलीस स्टेशनच्या मागे, सिव्हिल लाइन्स, नागपूर येथे उपस्थित राहणार आहेत. राज्यातील स्पर्धा परीक्षार्थींच्या भवितव्याशी संबंधित असलेल्या या प्रक्रियेत नागपूर महसूल विभागातील सर्व संबंधित घटकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या सूचना व अभिप्राय समितीसमोर सादर करावेत, असे आवाहन विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी केले.

विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी आज विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहात याबाबत आढावा बैठक घेतली. त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, अपर आयुक्त प्रदीप कुलकर्णी, जिल्हा शल्यचिकित्सक निवृत्ती राठोड तसेच माहिती व जनसंपर्क कार्यालयाचे संचालक डॉ. गणेश मुळे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. यावेळी महानगरपालिका तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी तसेच परीक्षांमधील गैरप्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाने उच्चस्तरीय समिती गठित केली आहे. या समितीच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक महसूल विभागातील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, कोचिंग क्लासेस, अभ्यासिका चालक, लोकप्रतिनिधी, नागरिक आणि अन्य संबंधित घटकांकडून परीक्षा पद्धतीतील सुधारणांसाठी सूचना व अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

या अनुषंगाने समितीचे अध्यक्ष व सदस्य बुधवार, दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता नियोजन भवन, सिव्हिल लाइन्स, नागपूर येथे संवाद कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत. त्यापूर्वी नागपूर विभागातील संबंधित घटकांकडून सूचना व अभिप्राय संकलित करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे. हा कक्ष मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत कार्यरत राहणार आहसचना व अभिप्राय निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांच्याकडे सादर करता येतील. प्रत्यक्ष सूचना निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या स्वीय शाखेत, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे स्वीकारण्यात येतील. तसेच हुँज्ल्-सिदैंदूँदैमँस्ँदुन्-रह या ई-मेलद्वारेही लेखी अभिप्राय पाठविता येणार आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयातील विशेष कक्षात प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नसलेल्या नागरिकांनी विहित मुदतीत ई-मेलद्वारे आपले अभिप्राय सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

विद्यमान परीक्षा प्रणाली तसेच विविध विभाग, प्राधिकरणे आणि परीक्षा घेणाऱ्या संस्थांच्या कार्यपद्धतीचा आढावा, परीक्षा अधिक सुरक्षित, निष्पक्ष, पारदर्शक व उमेदवाराभिमुख करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून निकाल प्रक्रियेपर्यंतची सुरक्षा, प्रश्नपत्रिकेचे मॉडरेशन, डिजिटल अथवा मुद्रित वितरण, गोपनीय वाहतूक, परीक्षा केंद्रांचे व्यवस्थापन, प्रतिसाद नोंदणी आणि मूल्यांकन याबाबत सूचना अपेक्षित आहेत.

नगरपंचायतीचा कचरा कारभार चव्हाट्यावर! शहीद भूमीला कचराकुंडी बनवून आष्टीकरांच्या आरोग्याशी खेळ सुरू!

आष्टी नगरपंचायतीचे नियोजन शून्य; शहराचा कचरा जलसंपदा विभागाच्या कॉलनीत





राहुल गजरे

आष्टी (शहीद): शहराच्या स्वच्छतेचा गवगवा करणाऱ्या आष्टी नगरपंचायतीच्या कारभाराची पोलखोल करणारे चित्र सध्या शहीद भूमी परिसरात पाहायला मिळत आहे. शहरातील कचरा व्यवस्थापनाचे योग्य नियोजन करण्यात नगरपंचायत सपशेल अपयशी ठरल्याने जागा मिळेल त्या ठिकाणी कचरा टाकण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शहीद भूमी परिसरासह जलसंपदा विभागाच्या अप्पर वर्धा कॉलनी परिसरात मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचे ढीग साचले आहेत.

कचरा व्यवस्थापनाचा बोजवारा

आष्टी शहरातील कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याऐवजी शहराचा कचरा थेट जलसंपदा विभागाच्या अप्पर वर्धा कॉलनी परिसरात टाकला जात असल्याचे चित्र आहे. परिणामी परिसरात दुर्गंधी, अस्वच्छता आणि नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. स्वच्छ शहराच्या घोषणा कुठे आणि प्रत्यक्षातील कचऱ्याचे ढीग कुठे? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

शाळेलगत कचऱ्याचे ढीग; विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न विशेष म्हणजे या कॉलनी परिसराला लागूनच हुतात्मा राष्ट्रीय विद्यालय आहे. शाळेच्या परिसरालगतच कचरा साचत असल्याने विद्यार्थी, शिक्षक तसेच परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. कचऱ्यामुळे माशा, डास आणि दुर्गंधीचा त्रास वाढत असून प्रशासन याकडे गांभीर्याने कधी पाहणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.



सत्ताधारी-विरोधक दोघेही अपयशी?

नगरपंचायतीतील सत्ताधारी नगरसेवक असोत किंवा विरोधी नगरसेवक—शहराच्या कचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नावर ठोस भूमिका घेण्यात दोन्ही बाजू अपयशी ठरत असल्याची नागरिकांची भावना आहे. शहरातील नागरिकांकडून कर वसूल केला जात असताना त्याबदल्यात मूलभूत स्वच्छता व्यवस्था देण्यात प्रशासनाला अपयश का येत आहे, असा सवाल आता उपस्थित होत आहे

मुख्याधिकाऱ्यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह

नगरपंचायतीचे मुख्याधिकारी शहरातील स्वच्छता व कचरा व्यवस्थापनाची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडत आहेत का, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. कचरा कुठे टाकायचा, त्याची विल्हेवाट कशी लावायची आणि नागरिकांना स्वच्छ वातावरण कसे उपलब्ध करून द्यायचे, याचे नियोजन करण्याची जबाबदारी नगरपंचायतीची असताना प्रत्यक्षात मात्र 'जागा मिळेल तिथे कचरा' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

प्रशासन जागे होणार कधी?

शहीद भूमीचा परिसर कचऱ्याच्या विळख्यात सापडलेला असताना नगरपंचायत प्रशासन नेमकी कोणत्या स्वच्छता नियोजनाची अंमलबजावणी करीत आहे, असा संतप्त सवाल नागरिकांकडून केला जात आहे. कचऱ्याचे ढीग हटवून कायमस्वरूपी कचरा व्यवस्थापनाची व्यवस्था करण्याबरोबरच शाळा व नागरी वस्तीच्या परिसरात कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

आष्टी शहराला स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याची जबाबदारी असलेल्या नगरपंचायतीने आता तरी कागदावरील नियोजन सोडून प्रत्यक्ष कृती करावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

संपादकीय

एमपीएससीवरील विश्वासाला तडा

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

पेपरफुटीच्या घटनांचा (MPSC) विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर, त्यांच्या मेहनतीवर आणि संपूर्ण परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर परिणाम होतो. एमपीएससीसारख्या संस्थेवरील विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा निर्माण करण्यासाठी मूलभूत सुधारणा आवश्यक आहेत. कारण एमपीएससीवरील विश्वासाला तडा गेला असेल तर प्रश्न फक्त पेपरफुटीचा नाही.

महाराष्ट्रातील लाखो तरुणांसाठी एमपीएससी ही केवळ एक परीक्षा घेणारी संस्था नाही ती त्यांच्या आयुष्यातील सर्वांत मोठा जुगार आहे, ज्यात ते स्वतःची तरुणाई पणाला लावतात. कोवळी वर्षे, कुटुंबाचा घाम, उधार घेतलेले पैसे, सोडून दिलेली नोकरीची संधी हे सगळं एका विश्वासावर उभं असतं- 'प्रामाणिकपणे झटलो, तर न्याय मिळेल.' आज हाच विश्वास कुणीतरी छिन्नविच्छिन्न करून टाकला आहे.

औषध निरीक्षक भरती परीक्षेतील पेपरफुटी ही केवळ एक घटना नाही हा एक विश्वासघात आहे. हजारो प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या पाठीत खुपसलेला सुरा आहे. प्रश्नपत्रिका परीक्षेपूर्वीच ठराविक लोकांच्या हातात पोहोचली, काहींनी जाणीवपूर्वक चुकीची उत्तरं देत संशयाचं जाळं चुकवलं, हे आरोप जर खरे ठरले, तर हा केवळ गैरप्रकार नाही, ही एका पूर्ण पिढीच्या स्वप्नांची हत्या आहे. रात्र रात्र जागून, डोळ्यांखाली काळी वर्तुळं घेऊन अभ्यास करणाऱ्या मुला-मुलींच्या चेहऱ्यावर ही घटना चपराक मारते आणि विचारते 'कशाला जीव जाळलास? इथे पैसा आणि ओळखच चालते.'

स्पर्धा परीक्षा ही समान संधीची पवित्र चौकट असते. पण जेव्हा त्या चौकटीलाच आतून कीड लागते, तेव्हा ही परीक्षा राहातच नाही ती एक भोंदू, विकाऊ खेळ बनते, जिथे गुणवत्तेचा गळा घोटून पैसा आणि वशिला जिंकतो. जो विद्यार्थी अशा परीक्षेत हरतो, तो केवळ एक पेपर हरत नाही त्याच्या मनात कायमचं एक विष पेरलं जातं- मेहनत ही मूर्खांची गोष्ट आहे. हे विष एका पिढीला उद्ध्वस्त करू शकतं आणि हीच खरी शोकांतिका आहे.

आणखी संतापजनक बाब म्हणजे या भ्रष्टाचाराचे धागेदोरे थेट आयोगाच्या गोपनीय गाभ्यापर्यंत पोहोचल्याचे आरोप आहेत. म्हणजे ज्या तिजोरीत विद्यार्थ्यांचं भवितव्य सुरक्षित असायला हवं होतं, तिथेच चोर घुसले! ही साधी सुरक्षा-त्रुटी नाही ही व्यवस्थेच्या गाभ्यातच बसलेली सडलेली मानसिकता आहे आणि जोपर्यंत या साखळीतील प्रत्येक हात, प्रत्येक सही, प्रत्येक टप्पा चव्हाट्यावर येत नाही, तोपर्यंत ही आग विझणार नाही, विझूही नये.

पेपरफुटी झाली की एक ठरलेला फार्स रंगतो- आरोप, चौकशीचे नाटक, दोन-चार बळीचे बकरे, परीक्षा रद्द आणि पुनर्परीक्षा घेऊ, असं गोंडस आश्वासन.

पण या नाटकात कुणी विचारतंय का की, ज्या मुलाने वयाची शेवटची संधी या परीक्षेत (MPSC) झोकली, त्याचं काय? ज्या मुलीने घरच्यांकडून कर्ज काढून क्लास लावला, तिच्या आई-वडिलांच्या डोळ्यातल्या पाण्याचं काय? गेलेला वेळ, गेलेला पैसा, गेलेली संधी हे कुणी परत देणार आहे का? पुनर्परीक्षा हे उत्तर नाही, ती जखमेवर फक्त बँडेज आहे. आतला ठणका तसाच धगधगत राहतो.

म्हणूनच पुण्याच्या रस्त्यावर उतरलेला तरुणांचा जमाव हा साधा निषेध नव्हता तो वर्षानुवर्षांच्या साचलेल्या संतापाचा उद्रेक होता, एक चित्कार होता. 'त्यांचा पेपर होता, आमची स्वप्नं होती' या एका वाक्यात हजारो तुटलेल्या स्वप्नांची किंकाळी दडलेली आहे. या मुलांना गोंडस आश्वासने नकोत, यांना डोकं चालवणाऱ्या राजकीय बडबडीचाही ऊबग आलाय. यांना फक्त एकच हवंय या व्यवस्थेने विकाऊ न होण्याची शाश्वती.

ही घटना 'माझ्या आधीच्या काळातली' आहे असं सांगून जबाबदारी झटकणं हे तर आणखी संतापजनक आहे. खुर्ची कुणाचीही असो, बुडणारी विश्वासार्हता ही आयोगाचीच आहे. एका माणसाच्या राजीनाम्याने किंवा बदलीने ही किड मरणार नाही. कारण, किड व्यक्तीत नाही, व्यवस्थेत आहे. प्रश्नपत्रिका तयार होण्यापासून ती केंद्रावर पोहोचेपर्यंतची संपूर्ण साखळी आज संशयाच्या भोवऱ्यात आहे आणि ती पूर्णतः उखडून टाकल्याशिवाय पर्याय नाही.

आज विद्यार्थ्यांना गोंडस भाषणं नकोत. त्यांना एवढंच हवंय- रात्री उशिरापर्यंत अभ्यास करताना, कुणीतरी पैशाच्या किंवा ओळखीच्या जोरावर त्यांच्या मेहनतीवर डल्ला मारणार नाही, याची खात्री आणि जर कुणी हा विश्वासघात केलाच, तर तो कुणाच्याही दबावाखाली दडपला जाणार नाही, ही हमी. कारण, परीक्षा व्यवस्थेचा पाया विश्वास आहे आणि एकदा तो उद्ध्वस्त झाला की, कितीही नियम बनवा, कितीही तंत्रज्ञान आणा, तो सहजासहजी परत उभा राहात नाही. आज एमपीएससीसमोर एका परीक्षेचं संकट नाही तिच्या अस्तित्वाचाच प्रश्न आहे.

दोषींना फक्त शिक्षा पुरेशी नाही; संपूर्ण साखळी उघड्यावर आणून, ती मुळापासून उखडून टाकावी लागेल. अन्यथा उद्या आणखी एक पिढी रस्त्यावर उतरेल आणि विचारेल, 'आमची स्वप्नं विकायला कुणी परवानगी दिली?' ओंकारेश्वरपासून जिल्हाधिकारी (MPSC) कार्यालयापर्यंत घोषणा देणारी ही तरुणाई एकच प्रश्न विचारतेय 'आम्ही जीव तोडून मेहनत करतोय; व्यवस्था तरी प्रामाणिक राहणार आहे का?' या प्रश्नाचं उत्तर टाळाटाळ करून मिळणार नाही. कारण, जर गैरप्रकार मेहनतीपेक्षा मोठा ठरू लागला, तर तो पराभव एका विद्यार्थ्याचा नसतो तो या संपूर्ण व्यवस्थेच्या आत्म्याचा खून असतो.

मराठवाडा मुक्ती संग्राम : स्वातंत्र्य, लोकशक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेचा गौरवशाली अध्याय



भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले; मात्र तत्कालीन हैदराबाद संस्थानातील जनतेला भारतीय संघात सहभागी होण्यासाठी आणखी तेरा महिने प्रतीक्षा करावी लागली. या संस्थानात आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा, तेलंगणाचा प्रदेश आणि कर्नाटकातील काही भागांचा समावेश होता. त्यामुळे १७ सप्टेंबर १९४८ हा दिवस केवळ एका प्रदेशाच्या मुक्तीचा दिवस नसून, भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणून स्मरणात राहिला आहे.

स्वातंत्र्य मिळाले; पण हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले नव्हते

१५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिश सत्ता संपुष्टात आल्यानंतर संस्थानांच्या भारतात विलिनीकरणाचा प्रश्न निर्माण झाला. तत्कालीन हैदराबादचे निजाम मीर उस्मान अली खान यांनी हैदराबाद स्वतंत्र अस्तित्वात ठेवण्याची भूमिका घेतली. भारत सरकार आणि हैदराबाद संस्थान यांच्यात वाटाघाटी सुरू राहिल्या. काही काळासाठी स्थिती कायम ठेवण्याचा करार अर्थात 'जैसे थे' करार (ऍंहे्ग्त्ॅासहू) करण्यात आला. मात्र संस्थानातील राजकीय परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होत गेली. गावागावांत रजाकारांविरुद्धचा संघर्ष वाढत गेला.

हैदराबाद संस्थानातील जनतेमध्ये नागरी हक्क, जबाबदार शासन आणि भारतीय संघात सहभागी होण्याची मागणी अधिक तीव्र होत होती. या लोकचळवळीला हैदराबाद स्टेट काँग्रेस, महाराष्ट्र परिषद तसेच विविध सामाजिक आणि राष्ट्रीय विचारांच्या संघटनांनी दिशा दिली.

मराठवाड्यात जागृतीची बीजे

मराठवाड्यातील मुक्तिसंग्राम अचानक सुरू झालेला नव्हता. त्यामागे अनेक वर्षांची सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय जागृती होती. राष्ट्रीय विचारांचा प्रसार करण्यासाठी विविध ठिकाणी शाळा, वाचनालये आणि सामाजिक संस्था कार्यरत होत्या. परभणीचे नूतन विद्यालय, औरंगाबादचे सरस्वती भुवन विद्यालय, हिप्परगा येथील शारदा मंदिर, अंबाजोगाईचे योगेश्वरी विद्यालय, उदगीरचे श्यामलाल विद्यालय, लातूरमधील ज्युबिली विद्यालय, बीडचे चंपावती विद्यालय, नांदेडचे प्रतिभा निकेतन आदी संस्थांनी राष्ट्रीय जागृतीच्या कार्याला हातभार लावला. या कार्याला स्वामी रामानंद तीर्थ आणि बाबासाहेब परांजपे यांची प्रेरणा लाभली.

१९३८ मध्ये हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या स्थापनेने या चळवळीला संघटित राजकीय स्वरूप मिळाले. निजाम सरकारने या संघटनेवर बंदी घातल्यानंतर सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारण्यात आला. मुक्तिसंग्रामासाठी स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, रवी नारायण रेड्डी, देवीसिंह चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, शंकरसिंह नाईक, विजयेंद्र काबरा आणि बाळासाहेब परांजपे यांनी लढ्याचे नेतृत्व केले.

काशिनाथ कुलकर्णी, दगडाबाई शेळके, विठ्ठलराव काटकर, हरिश्चंद्र जाधव, जनार्दन होर्टीकर गुरुजी, सूर्यभान पवार, आ. कृ. वाघमारे, विनायकराव चारठाणकर, विश्वनाथराव कातमेश्वरकर अशा अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास अजरामर केला आहे. गावागावातील संघर्षांमध्ये अनेक अनामिक वीरांनी आपले बलिदान दिले. १९३८ च्या सत्याग्रहातील नांदेडच्या कार्यकर्त्यांचा सहभाग या लढ्यात विशेषत्वाने नोंदविला गेला आहे.

आठ जिल्ह्यांची व्यापक लोकचळवळ

आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली हे आठ जिल्हे आहेत. तत्कालीन काळातील प्रशासकीय सीमांमध्ये काही बदल झाले असले तरी या संपूर्ण मराठी भाषिक प्रदेशाने हैदराबाद मुक्तिसंग्रामाच्या लढ्यात महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला. मराठवाड्याचा संपूर्ण मराठी भाषिक प्रदेश भारतीय संघात विलीन होण्यासाठी आतुर होता.

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई हे स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कार्याचे प्रमुख केंद्र होते. हैदराबाद मुक्तिसंग्रामात बीड जिल्ह्यातील अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी योगदान दिले आणि अनेक स्वातंत्र्यसैनिक हुतात्मा झाले. या व्यापक लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, विजयेंद्र काबरा आणि पी. एच. पटवर्धन यांसारख्या नेत्यांची भूमिका महत्त्वाची ठरली.

लढ्याचे स्वरूप केवळ एका शहरापुरते मर्यादित नव्हते. नांदेड, परभणी, सेलू, जालना, अंबड, बीड, उस्मानाबाद, लातूर, अंबाजोगाई, उदगीर, उमरी, धर्माबाद, कंधार, देगलूर आदी भागांत विविध स्वरूपाचे सत्याग्रह, जनजागृती आणि प्रतिकाराच्या चळवळी झाल्या.

दडपशाहीला लोकशक्तीचा प्रतिकार

स्वातंत्र्याच्या मागणीला तत्कालीन सत्तेकडून विरोध झाला. आंदोलनकर्त्यांना अटक, कारावास आणि विविध प्रकारच्या दडपशाहीला सामोरे जावे लागले. परिस्थिती अधिक गंभीर झाल्यानंतर रजाकारांच्या हिंसक कारवायांमुळे सामान्य नागरिकांच्या अडचणी वाढल्या. लोकशाही, नागरी हक्क आणि जबाबदार शासनासाठी जनतेने निकराचा संघर्ष केला.

प्रशासनाच्या नोंदीनुसार, १९४२ च्या 'भारत छोडो' चळवळीत नांदेड, वैजापूर, गंगापूर, परभणी, सेलू, उस्मानाबाद, बीड, अहमदपूर, जालना आणि अंबड यांसारख्या ठिकाणी सत्याग्रहींना कारावास भोगावा लागला. या आंदोलनामुळे हैदराबाद संस्थानातील स्वातंत्र्यवादी शक्ती अधिक संघटित झाल्या. स्वातंत्र्याच्या लढ्यातील या सहभागामुळे मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या लढ्याला आणखी गती मिळाली.

निजाम आणि भारत सरकारची भूमिका

भारत सरकारने हैदराबाद प्रश्न सोडविण्यासाठी सुरुवातीला संवाद आणि वाटाघाटींचा मार्ग स्वीकारला. मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याने भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी निर्णायक भूमिका घेतली. १३ सप्टेंबर १९४८ रोजी 'ऑपरेशन पोलो' सुरू झाले. भारतीय सैन्याच्या कारवाईसमोर हैदराबाद संस्थानाच्या सैन्याचा प्रतिकार फार काळ टिकला नाही. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने शरणागती स्वीकारली आणि हैदराबाद संस्थान भारतीय संघात विलीन झाले.

केंद्र सरकारच्या अधिकृत नोंदींमध्ये या प्रक्रियेला भारताच्या राजकीय एकात्मतेतील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून अधोरेखित करण्यात आले आहे. स्वातंत्र्योत्तर भारताने संस्थानांचे एकत्रीकरण करताना संवाद, राजनैतिक प्रयत्न आणि आवश्यक त्या वेळी निर्णायक कारवाई यांचा समन्वय साधला. हैदराबादच्या प्रश्नावर भारत सरकारने सुरुवातीला संवाद व राजनैतिक प्रयत्नांचा मार्ग स्वीकारला; मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यानंतर निर्णायक लष्करी कारवाई करण्यात आली. हैदराबादचा संघर्ष आणि विलीनीकरण हा एकसंघ भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय ठरला.

भारताच्या मध्यभागी स्वतंत्र राज्याचे अस्तित्व कायम राहिल्यास निर्माण होणारी राजकीय आणि प्रशासकीय गुंतागुंत किती गंभीर ठरली असती, याची कल्पना आजही करता येते. भारताच्या राजकीय एकात्मतेच्या दृष्टीने ही कारवाई किती महत्त्वाची होती, हे त्यानंतरच्या घडामोडींवरून स्पष्ट होते. त्यामुळे संस्थानांच्या विलीनीकरणासाठी झालेला हा संघर्ष भारताच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटनाक्रम ठरला आहे.

भाषिक वेगळेपणही लक्षणीय ठरले

१९४८ मध्ये भारतीय संघात समाविष्ट झालेले हैदराबाद संस्थान आज एकाच राज्याचा भाग नाही. त्यातील मराठवाडा महाराष्ट्रात, तेलुगू भाषिक प्रदेश तेलंगणात आणि कन्नड भाषिक प्रदेश कर्नाटकात समाविष्ट झाला. तत्कालीन हैदराबाद राज्यात आजच्या तेलंगणासह मराठवाडा आणि कर्नाटकातील काही जिल्ह्यांचा समावेश होता.

भाषावार प्रांतरचनेनंतर मराठवाडा १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याचा भाग झाला. अशा प्रकारे १९४८ मध्ये भारतीय संघाशी जोडलेला हा प्रदेश पुढे आधुनिक महाराष्ट्राच्या प्रशासकीय आणि सामाजिक विकासाचा अविभाज्य घटक बनला.

१७ सप्टेंबर : मुक्तिसंग्राम दिन

महाराष्ट्र शासनाने ४ मे २००१ रोजी शासन निर्णयाद्वारे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा विभागात 'मुक्तिसंग्राम दिन' म्हणून कायमस्वरूपी साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर १७ सप्टेंबर रोजी मराठवाड्यात शासकीय पातळीवर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांत हा दिवस साजरा केला जातो.

विभागीय मुख्यालय असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्याची परंपरा आहे. इतर जिल्ह्यांतही पालकमंत्री किंवा नियुक्त मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण केले जाते.

छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री ध्वजारोहण करतात, कारण हे शहर मराठवाड्याचे विभागीय मुख्यालय असून मुक्तिसंग्रामाच्या स्मृतींशी जोडलेले प्रमुख केंद्र आहे. स्मृतिस्तंभाला अभिवादन, हुतात्म्यांना श्रद्धांजली, ध्वजारोहण, मानवंदना आणि विविध शासकीय कार्यक्रमांद्वारे या इतिहासाचे स्मरण केले जाते. महाराष्ट्र शासन मुक्तिसंग्रामाचा इतिहास पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी १०० कोटी रुपये खर्चून छत्रपती संभाजीनगर येथे स्मारक उभारत आहे.

इतिहासाचा सन्मान, भविष्याची प्रेरणा

मराठवाडा मुक्तिसंग्राम हा केवळ भूतकाळातील संघर्ष नाही. तो लोकशाही, स्वातंत्र्य, नागरी हक्क, राष्ट्रीय एकात्मता आणि लोकसहभागाच्या मूल्यांची जाणीव करून देणारा इतिहास आहे. या लढ्यात ज्ञात-अज्ञात असंख्य स्वातंत्र्यसैनिक, कार्यकर्ते, महिला, युवक आणि सामान्य नागरिकांनी योगदान दिले. त्यांच्या त्यागामुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाड्याच्या भारतीय संघात विलिनीकरणाचा मार्ग मोकळा झाला.

१७ सप्टेंबर रोजी तिरंगा अभिमानाने फडकताना त्या काळातील स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची आठवण होते. हा दिवस अन्यायाविरुद्धच्या लोकशाही मूल्यांच्या आणि भारताच्या एकात्मतेच्या विजयाचे स्मरण करून देतो.

मराठवाड्याने भारताच्या एकात्मतेसाठी दिलेले योगदान इतिहासाच्या पानांवर अढळ आहे. छत्रपती संभाजीनगरपासून नांदेडपर्यंत, जालन्यापासून लातूरपर्यंत, बीडपासून धाराशिवपर्यंत आणि परभणीपासून हिंगोलीपर्यंत या भूमीने स्वातंत्र्याची आस जपली आणि राष्ट्रीय प्रवाहात सहभागी होण्यासाठी संघर्ष केला. त्या ज्ञात-अज्ञात वीरांना आणि वीरांगनांना कृतज्ञ अभिवादन करणे आणि त्यांच्या त्यागातून लोकशाही व राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, हीच मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाची खरी प्रेरणा आहे.

१७ सप्टेंबर हा त्यामुळे केवळ स्मरणाचा दिवस नाही; तो मराठवाड्याच्या देशभक्तीला, लोकशक्तीला आणि अखंड भारताच्या एकात्मतेला अभिवादन करण्याचा दिवस आहे.

प्रवीण टाके
उपसंचालक
विभागीय माहिती कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर



व्यथा मांडावी मी आयुष्याची
ऐकणारी जवळ एक जागा आहे,
काळजी, प्रेम, हक्क साऱ्यांची बेरीज
मैत्रीवाचून आयुष्य माझे वजा आहे !
~ काव्य स्वर

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि सार्वजनिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिधार्मिक व सामाजिक सार्वजनिक कार्यक्रमांची रेलचेल: श्रीगणेश चतुर्थी ?

श्रीगणेश चतुर्थी- गणेशोत्सव विशेष.)

भारतात सार्वजनिक गणेशोत्सव हे भारतीयांना एकत्र आणण्यासाठी आणि विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी लोकमान्य टिळकांनी सन १८९४ साली केली. या काळात गणेशाच्या उपस्थितीत अनेक धार्मिक व सामाजिक सार्वजनिक कार्यक्रम केले जातात. भारतीय स्वातंत्र्य लढ्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या व्यासपीठाचा वापर केला. गणेशोत्सव आणि शिवजयंती या प्रसंगांचे औचित्य साधून टिळकांनी युवकांमध्ये राष्ट्रतेज जागृत करण्याचा प्रयत्न केला. श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी यांचा सदर माहितीपूर्ण संकलित लेख प्रस्तुत जी... संपादक.

श्रीगणेश चतुर्थी हा हिंदूंचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि आनंदाचा सण आहे. गणेश चतुर्थी म्हणजे काय? हा सण भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील चतुर्थीला साजरा केला जातो. हा गणपती बाप्पाचा जन्मोत्सव मानला जातो. गणपती हा बुद्धी, समृद्धी आणि विघ्नहर्ता- संकटे दूर करणारा) मानला जातो. प्राणप्रतिष्ठा आणि पूजन विधीया दिवशी घरात किंवा सार्वजनिक मंडळात गणेशाच्या मातीच्या (पार्थिव) मूर्तीची स्थापना केली जाते. षोडशोपचारांनी (सोळा उपचारांनी) बाप्पाची पूजा केली जाते. पूजेत बाप्पाला २१ पत्री (विविध प्रकारची पाने), दुर्वा, फुले आणि मोदकांचा नैवेद्य दाखवला जातो. सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्वामुळे लोकमान्य टिळकांनी आणि इतर स्वातंत्र्यसैनिकांनी या सणाला सार्वजनिक स्वरूप दिले, जेणेकरून लोक एकत्र येऊ शकतील. हा सण एकता, भक्ती आणि संस्कृतीचा संदेश देतो. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करणे आजच्या काळात अत्यंत गरजेचे आहे. तुम्हाला गणेशोत्सवाविषयी आणखी काय जाणून घ्यायला आवडेल? जसे की: पूजेचा विधी आणि साहित्य गणेशोत्सवाचा इतिहास नैवेद्य आणि मोदक, आदीबद्दल मी अधिक माहिती देत आहे.

चतुर्थीला गणेशाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते. श्री गणेशाच्या प्रतिष्ठापना विधीमध्ये पार्थिव मूर्तीची आवाहन, स्नान, अभिषेक, वस्त्र, चंदन, फुले, पत्रे... श्रीगणेश चतुर्थी फक्त सण साजरा करण्याचा नाही, तर त्यामागचा सामाजिक दृष्टीकोनही महत्त्वाचा आहे. गणेश चतुर्थी हा सण भक्तीचा, संस्कृतीचा, आणि एकतेचा सण आहे. गणपती बाप्पा.. काही वर्षी हरतालिका आणि गणेश चतुर्थी एकाच दिवशी, यापूर्वी सन २०००, २००६ आणि २००९ मध्ये हरतालिका आणि श्री गणेश चतुर्थी एकाच दिवशी आले होते. यानंतर सन २०३२ मध्येही असाच योग येणार आहे असे पंचांग कर्ते खगोल अभ्यासक सांगतात. श्री गणेश चतुर्थी हा हिंदूंचा मोठा सण आहे. श्री गणेश चतुर्थी



हे भाद्रपद शुक्ल चतुर्थीला केले जाणारे एक धार्मिक व्रत आहे. गणेशाच्या अवतारांपैकी श्रीगणेशजींचा जन्म. गणेश पुराण कथासार- गणेश पुराण या संस्कृत ग्रंथातील कथांचा मराठीतील सारांश किंवा कथांचे संकलन होय, ज्यात गणेशाचे अवतार, लीला, विविध कथा आणि तत्त्वज्ञान यांनी परिपूर्ण आहे...

श्रीगणेश चतुर्थी हे भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्ष चतुर्थीला केले जाणारे एक धार्मिक व्रत आहे. गणेश चतुर्थी या दिवसाला महासिद्धीविनायकी चतुर्थी किंवा 'शिवा' असेही म्हटले जाते. या चतुर्थीला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आणि स्थान आहे. असे मानले जाते की, गणेशाला प्रसन्न केल्याने घरात सुख समृद्धी आणि शांती प्रस्थापित होते. गणेशाला मोदक खूप आवडतात. म्हणूनच गणेश चतुर्थीच्या दिवशी गणेशाला मोदकांचा नैवेद्य अर्पण केला जातो, त्याचप्रमाणे जास्वंदीचे फुल, शमी पत्री आणि दुर्वा या ही खूप आवडीच्या असल्यामुळे त्याही अर्पण केल्या जातात. उंदीर हे गणेशाचे वाहन आहे. स्त्रीमनाचे लोकदैवत असेही श्री गणेशाला मानतात. श्रीगणेश चतुर्थीच्या पहिल्या दिवशी गणपतीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते आणि गणपतीच्या पूजेनंतर आरती केली जाते. प्रमुख्याने माती पासूनच बनवलेल्या गणेश मूर्तिचे पूजन केले जाते. गोव्यातील गाणपत्य संप्रदायाचे हे एक व्रत आहे. श्रावण शुक्ल चतुर्थी ते भाद्रपद शुक्ल चतुर्थी असे महिनाभर करायचे हे व्रत आहे. नदीकिनारी जाऊन, स्नान करून आपल्या हाताच्या अंगठ्याएवढी मातीची गणेशमूर्ती हातावरच तयार करतात. तिचे सोळा उपचारांनी पूजन करून ती एका नदीतच विसर्जन करतात, असे हे व्रत आहे. याला 'पार्थिव गणेश व्रत' म्हणतात. महिनाभर जमले नाही तर किमान शेवटच्या दिवशी तरी पार्थिव मूर्तीची पूजा करावी अशी यामागे धारणा आहे.

गणेशोत्सव: प्रतिष्ठापना पूजा- घरगुती गणेश स्थापना- गणेश चतुर्थीला गणेशाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते. श्री गणेशाच्या प्रतिष्ठापना विधीमध्ये पार्थिव मूर्तीचे आवाहन, स्नान, अभिषेक, वस्त्र, चंदन, फुले, पत्री, नैवेद्य इ.सोळा उपचारांनी पूजा केली जाते. यामध्ये त्याला विविध २१ पत्री अर्पण केल्या जातात. पावसाळ्यात या सर्व पत्री सामान्यतः उपलब्ध असतात आणि त्या प्रत्येक वनस्पतीला काही औषधी गुणधर्मही आहेत. मूर्तीचे विसर्जन करण्यापूर्वी तिची उत्तरपूजा करतात. मूर्तीचे विसर्जन करण्यापूर्वी पुढील मंत्र म्हणतात. ' यान्तु देवगणा: सर्वे पूजामादाय पार्थिवीम् । इष्टकामप्रसिद्ध्यर्थं पुनरागमनाय च ।।' श्री महागणपतिपूजन केलेल्या नारळावर तसेच उमामहेश?वर आणि श्री सिद्धिविनायक यांच्यावर अक्षता वाहून मूर्ती स्थानापासून थोडी हलवतात. त्यानंतर जलाशयात तिचे विसर्जन करतात. काळाच्या ओघात हे व्रत कुटुंबाच्या पद्धतीनुसार दीड, पाच, सात, दहा दिवस केले जाते. काही कुटुंबात २१ दिवस हे व्रत करतात, तर काही ठिकाणी हे व्रत वार्षिक स्वरूपाचे असते. या दिवशी किंवा घरात गणपती असेपर्यंत अथर्वशीर्ष स्तोत्राचे पठण केले जाते. काही ठिकाणी गणेशगीता या ग्रंथाचे वाचनही केले जाते. गणपती ही संघटनेची देवता आहे. ऋग्वेदात ब्राह्मणस्पती देवतेची स्तुती केलेली आहे. तो सर्व गणांचा अधिपती आहे असे त्यात म्हटले आहे. या देवतेचा विकास होऊन पुराणकाळात तिला गणपती हे रूप प्राप्त झाले, असे मानले जाते. भाद्रपद शुक्ल चतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत महाराष्ट्रात गणेशोत्सव साजरा होत असतो. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक धोरणानुसार सन २०२५ साली गणेशोत्सवाला 'राज्योत्सव' अशी मान्यता जाहीर करण्यात आली आहे. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!!! श्रीगणेशोत्सवाच्या समस्त भाविकभक्तांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!!

- संकलन व सुलेखन -
श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.
राह. श्रीगुरूदेव हरदेवकृपा निवास,
पॉवर हाऊसच्या मागे, एकता चौक, रामनगर वॉर्ड,
गडचिरोली. फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.

जनप्रभात हे दैनिक जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टा, ता. आष्टी, जि. वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी, जि. वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242

कंत्राटी कामगारांच्या हक्कांसाठी मनसे कामगार सेनेचे नगरपरिषद प्रशासनाला निवेदन

शिरूर / प्रतिनिधी

शिरूर नगरपरिषदेत कार्यरत कंत्राटी कामगारांना महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेचे सभासद होण्यापासून संबंधित कंत्राटदारांकडून मज्जाव केला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी मनसे कामगार सेनेच्या वतीने नगरपरिषद प्रशासनाला निवेदन देण्यात आले असून, तातडीने हस्तक्षेप करून कामगारांना त्यांच्या हक्कानुसार संघटनेचे सभासद होण्याची संधी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



निवेदनानुसार, शिरूर नगरपरिषदेत कार्यरत कंत्राटी कामगारांसाठी महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेची संघटना स्थापन करण्यात आली आहे. मात्र, संघटनेचे सभासदत्व स्वीकारलेल्या कामगारांना संबंधित कंत्राटदारांकडून कामावर रुजू करून घेण्यास जाणीवपूर्वक मज्जाव केला जात असल्याचा आरोप आहे. दि. १२ सप्टेंबर २०२६ पासून कामगारांना कामावर रुजू करून घेण्यात येऊ नये, अशा प्रकारे दबाव आणला जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

कामगारांना त्यांच्या कायदेशीर हक्कानुसार संघटनेचे सभासद होण्याचा तसेच आपल्या न्याय्य मागण्यांसाठी संघटित होण्याचा अधिकार आहे. केवळ संघटनेचे सभासदत्व स्वीकारल्यामुळे कामगारांना कामापासून वंचित ठेवणे अन्यायकारक असल्याचे मनसे कामगार सेनेने म्हटले आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषी कंत्राटदारावर कामगार कायद्यानुसार योग्य ती कारवाई करावी, तसेच संघटनेचे सभासद झाल्यामुळे कोणत्याही कामगारावर भेदभाव अथवा अन्याय होणार नाही, याबाबत कंत्राटदारांना स्पष्ट सूचना द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, कामगारांच्या हक्कांचे संरक्षण न झाल्यास शिरूर नगरपरिषद प्रवेशद्वारासमोर दि. १२ सप्टेंबरपासून प्रशासकीय बेठेत आंदोलन सुरू करण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

शिक्षक हा समाजाचा दीपस्तंभ- प्राचार्य तुकाराम बेनके



पुणे प्रतिनिधी/ शकील मनियार

आलेगाव पागा तालुका (ता.शिरूर) येथील श्री भैरवनाथ माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भारताचे माजी राष्ट्रपती, शिक्षकतज्ञ डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली.त्यानंतर दीपप्रज्वलन करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यालयाचे प्राचार्य तुकाराम बेनके सर यांनी भूषवले. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यालयाचे व्यवस्थापकीय संचालक अनिकेत बेनके, उपप्राचार्य संभाजी कुटे,कॉलेज प्रमुख संतोष शेळके,संतोष हिंगे, दिलीप बालके,अंबादास गावडे, नितीन गरुड,देविदास कंटाळे, प्रा.सिद्धार्थ गायकवाड,रविंद्र चौधरी,शरद शेलार,बाबा मगर, प्रभाकर औटी,सतीश अवचिते,वैभव लाड,सुप्रिया काळभोर,प्राजक्ता शितोळे,ज्योती गजरे,मंजुश्री निंबाळकर,कोमल साव्रस,रोहिणी धुमाळ उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गौरी वाकचौरे व वेदिका शितोळे या विद्यार्थिनींनी केले. याप्रसंगी आयेशा गुंजाळ,गौरी वेताळ,श्राव्या वाकचौरे,ज्ञानेश्वरी भोसले,रुद्र भोसले,हर्ष कुंभकर्ण,सृष्टी बेनके, राधिका रासकर,सानिका वाकचौरे, सानिका काळभोर,गौरी बेनके, वैष्णवी कोळपे या विद्यार्थिनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी सर्व शिक्षकांचा पुष्प व पेन देऊन सन्मान करण्यात आला.

विद्यालयाचे प्राचार्य बेनके सर यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले ते म्हणाले शिक्षकहा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाला आकार देणारा शिल्पकार असतो.जबाबदार नागरिक बनवणे हे शिक्षकाची खरी भूमिका आहे.

बीड जिल्ह्यात अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांना आळा घालून कठोर व तातडीच्या उपाययोजना करण्यात यावी.. प्रमिलाताई माळी ओतारी

बीड/ प्रतिनिधि: -



बीड जिल्ह्यात अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या घटना वारंवार समोर येत असल्याने पालकांच्या मनात भीती आणि समाजात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. ज्या वयात मुलींनी निर्भयपणे शिक्षण घ्यावे, खेळावे आणि आपले भविष्य घडवावे, त्या वयात त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होणे ही अत्यंत गंभीर आणि संतापजनक बाब आहे.

चिमुकल्या मुलींच्या सुरक्षेबाबत प्रशासनाने आता केवळ आश्वासनांवर न थांबता ठोस कृती करण्याची वेळ आली आहे. अशा घटनांमधील आरोपींवर कायद्यानुसार कठोर कारवाई झाली पाहिजे आणि पीडित मुलींना तातडीने संरक्षण, समुपदेशन व आवश्यक मदत मिळाली पाहिजे.

त्यासाठी बीड जिल्ह्यात—१. अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या तक्रारींची तातडीने दखल घेऊन जलद तपास करण्यात यावा.

२. दोषींवर पोक्सो कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी.

३. शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे तसेच मुलींची वर्दळ असलेल्या परिसरात पोलीस गस्त व सुरक्षा व्यवस्था वाढवावी.

४. मुलींच्या सुरक्षिततेसाठी संवेदनशील ठिकाणांची पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना तातडीने कराव्यात.

५. पीडित मुली व त्यांच्या कुटुंबीयांना कायदेशीर, मानसिक व सामाजिक आधार उपलब्ध करून द्यावा.

६. बालकांच्या सुरक्षेसाठी कार्यरत यंत्रणांमध्ये अधिक प्रभावी समन्वय निर्माण करावा.

७. भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी जिल्हास्तरावर विशेष कृती आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी.

बीड जिल्ह्यातील एकाही मुलीला भीतीच्या वातावरणात जगण्याची वेळ येता कामा नये. मुलींच्या सुरक्षिततेत प्रशासनाची कसोटी आहे. त्यामुळे या विषयाकडे गांभीर्याने पाहून ?

वाईत विकास आण्णा शिंदे मित्र परिवाराची भव्य दहीहंडी उत्साहात



वाई : सातारा जिल्हा परिषद सदस्य बापूसाहेब शिंदे यांच्या वतीने युवा नेते विकास अण्णा शिंदे यांच्या मित्र परिवारातर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य दहीहंडी उत्सव पारंपरिक थाटात व मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी दहीहंडीसाठी १ लाख ५१ हजार १११ रुपयांचे वाई शहरातील सर्वाधिक बक्षीस ठेवण्यात आले होते.

वाई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रदीप सूर्यवंशी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद सदस्य बापूसाहेब शिंदे, पंचायत समितीचे सभापती पै.भैय्यासाहेब डोंगरे, विकास(आण्णा)शिंदे, प्रवीण शिंदे, वसंत तुपे, शरद विटकर, काशिनाथ चोरट, रमाकांत यादव, शाम चावलानी, नाना पिसाळ, तरुण शिंदे, तनिश शिंदे ,त्रिशिव शिंदे आदी उपस्थित होते.

सिद्धेश्वर क्रीडा मंडळ व ग्रामस्थ मंडळ, सिद्धनाथवाडी यांनी उत्कृष्ट समन्वय व चिकाटी दाखवत दहीहंडी फोडण्याचा मान पटकावला. ढोल-ताशांच्या गजरात व जल्लोषात पार पडलेल्या या सोहळ्याला बाईकरांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाचे स्वागत व आभार विकास शिंदे यांनी मानले. उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रणव ओरवे, दादासाहेब काळे, दत्तात्रय वाडकर, धीरज ओसवाल, उमेश माने, राजेशकावडे, नितीन चोरट, सचिन वायदंडे, पांडुरंग वरे, दत्तात्रय पोळ, सोपान चिकणे, धनंजय चव्हाण, बबलू मुलाणी, तुकाराम तुपे, अमीन वनारसे, धनंजय मुलीय, अमोल चोरट, रवी मोझर, स्वप्नील त्रिंबके, प्रथमेश ढोणे आदींनी परिश्रम घेतले.

गृहप्रवेश व बुद्धपूजा निमित्त भोसले परिवाराला भीम छावा संघटनेची सदिच्छा भेट

शिरूर तालुक्यात गावखेड्यांमध्ये शाखा विस्तारातून समाजसेवेचा संकल्प



पुणे प्रतिनिधी : शकील मनियार

दिनांक १३ सप्टेंबर २०२६ रोजी मयूर भोसले यांच्या गृहप्रवेश व बुद्धपूजा कार्यक्रमानिमित्त भीम छावा संघटनेचे अध्यक्ष माननीय श्यामभाऊ गायकवाड तसेच संघटनेचे पदाधिकारी यांनी भोसले परिवाराची सदिच्छा भेट घेऊन त्यांना शुभेच्छा व आशीर्वाद दिले.

यावेळी भीम छावा संघटनेचे पदाधिकारी नरेश मदनूर, गौतम कांबळे, अमोल शिंदे तसेच शिरूर तालुका अध्यक्ष प्रकाश रावजी डंबाळे उपस्थित होते. भारतीय बौद्ध महासभा पुणे, शिरूर तालुका अध्यक्ष व बौद्धाचार्य सुनील जयसिंग गायकवाड आणि माणिक बाजीराव गायकवाड यांचीही उपस्थिती होती.

या भेटीदरम्यान भीम छावा संघटनेचे अध्यक्ष श्यामभाऊ गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर तालुक्यातील विविध गावखेडे व पाड्यांमध्ये संघटनेच्या शाखा सुरू करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या शाखांच्या माध्यमातून समाजातील गरजू व वंचित घटकांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक तसेच विविध क्षेत्रांतील समाजाच्या प्रश्नांसाठी संघटनेच्या माध्यमातून आवाज उठवून ते प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच गोरगरीब नागरिकांच्या अडचणी सोडविणे, समाजामध्ये जनजागृती करणे आणि धम्माचे कार्य अधिक व्यापक पद्धतीने गावागावात पोहोचविण्यासाठी शाखांच्या माध्यमातून कार्य केले जाईल, अशी भूमिका प्रकाश रावजी डोंबाळे यांनी व्यक्त केली.

शिरूर तालुक्यात संघटनेच्या शाखांचा विस्तार करून समाजहितासाठी सातत्याने कार्य करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. या उपक्रमाला भीम छावा संघटनेचे अध्यक्ष श्यामभाऊ गायकवाड यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार भारतीय बौद्ध महासभा पुणे, शिरूर तालुका अध्यक्ष व बौद्धाचार्य सुनील जयसिंग गायकवाड यांनी मानले.

बेल्हा - जेजुरी महामार्गावरती अपघाता मध्ये लोणी येथील शकील सय्यद या तरुणाचा मृत्यू

कैलास गायकवाड / विशेष प्रतिनिधी

लोणी ता. आंबेगाव येथील तरुण उद्योजक शकील शब्बीर सय्यद वय वर्षे अंदाजे ३५ बेल्हा- जेजुरी महामार्गावरती पावळ जवळ पाबळ, ता. शिरूर येथे काही कामानिमित्त जात असताना,गाडी घसरून पडल्यामुळे अपघातात मृत्यू झाला. लोणी गावामधील एक होतकरू तरुण, आपल्या व्यवसायामध्ये सर्वांशी गोडीने बोलणारा व प्रेमळ व्यक्तिमत्व असलेला तरुण अपघातात दगावला आहे . या मुळे या महामार्गावरचा अपघाताच्या



बाबतीतला गंभीर प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मृत्यू पावलेल्या शकील मागे त्याची पत्नी, दोन मुली एक मुलगा आई वडील भाऊ बहीण असे कुटुंब आहे. सामाजिक कार्यकर्ते चेतन लोखंडे यांनी या महामार्गावरील अपघाताचा प्रश्न उपस्थित करून या होणाऱ्या गंभीर अपघाता बाबत काहीतरी उपाययोजना करावी असे आवाहन केले आहे. या महामार्गा वरील अपघातामुळे आपल्या जीवाभावाच्या व्यक्ती आपल्यापासून दूर होत आहे. यावर काहीतरी ठोस उपाय शोधला पाहिजे असे मत व्यक्त केले. शकीलच्या जाण्याने संपूर्ण सय्यद कुटुंबावरती दुःखाचा डोंगर कोसळला असून लोणी आणि लोणी परिसरावर शोककळा पसरली आहे. अंत्ययात्रेच्या वेळी लोणी आणि परिसरातील मोठ्या संख्येने ग्रामस्थ, शेतकरी,व्यापारी, नातेवाईक उपस्थित होते.

अण्णापूर



प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ओजस्वी शिर्के चे घवघवीत यश

वाई, दि. १३ : महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता चौथी) मध्ये एकसर येथील जिल्हा परिषद केंद्र शाळेची विद्यार्थिनी कु. ओजस्वी शुभांगी प्रमोद शिर्के हिने घवघवीत यश संपादन केले. तिने जिल्हात ७५ वा, तर तालुक्यात पाचवा क्रमांक मिळवून आपल्या गुणवत्तेची छाप उमटवली. ओजस्वीला शाळेच्या मुख्याध्यापिका प्रभावती थोरवे तसेच शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. तिचे आई-वडीलही शिक्षक असून, त्यांच्या मार्गदर्शनामुळे तिने विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तिची आई शुभांगी शिर्के यांची नुकतीच पवित्र पोर्टलद्वारे जिल्हा परिषद शाळा, शिरगाव येथे नियुक्ती झाली आहे. तिच्या आजी एकसर येथे मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत असून, मामा स्पर्धा परीक्षेतून पोलीस उपनिरीक्षक म्हणून पुणे येथे कार्यरत आहेत.

ओजस्वीने प्रज्ञाशोध परीक्षेत जिल्ह्यात सातवा, अभिरूप शिष्यवृत्ती परीक्षेत आठवा, आंतरभारती परीक्षेत देशात ४३ वा क्रमांक मिळवून आपल्या गुणवत्तेची सातत्याने चमक दाखवली आहे. मोठे यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी हर्षवर्धन मोरे, विस्ताराधिकारी साईनाथ बाळेकर, केंद्रप्रमुख क्रांती तापकीर, मुख्याध्यापिका प्रभावती थोरवे, डॉ. दत्तात्रय थोरवे तसेच ग्रामसेवक व ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

मोबाईलच्या अतिवापरामुळे स्क्रीनच्या व्यसनाचा धोका; विद्यार्थ्यांना तज्ज्ञांचा इशारा



पुणे प्रतिनिधी/ शकील मनियार

क्रांतिवीर चापेकर स्मारक समिती संचलित लोकमान्य टिळक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शुक्रवार, दिनांक ११ सप्टेंबर २०२६ रोजी रोटरी क्लब ऑफ आकुर्डी यांच्या वतीने विद्यालयातील बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच लेखनिकांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ आकुर्डीचे अध्यक्ष रोटेरियन रामेश्वर लाहोटी, सचिव रोटेरियन समीना शेख, फर्स्ट लेडी सौ. सुनीतालाहोटी, अध्यक्ष-निर्वाचित व प्रशासकीय संचालक रोटेरियन आनंदीता मुखर्जी, सभासदत्व संचालक रोटेरियन सीमा शर्मा, आयटी संचालक रोटेरियन स्वाती तेरुगे, युवा संचालक रोटेरियन अजिंक्य सूद, सदस्य रोटेरियन भूषण बोबडे व श्री. राजिंदर सोखी उपस्थित होते.तसेच विद्यालयाच्या बालवाडी प्रमुख सौ. स्मिता जोशी, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. मंजुषा गोडसे तसेच पालक प्रमुख व माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. सुनीताघोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रतिनिधी/ शकील मनियार

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गौरव

शिक्षक दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ आकुर्डी यांच्या वतीने विद्यालयातील बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच लेखनिकांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी प्रमुख वक्त्या सौ. शोभा श्रीकांत, संचालक, पल्व्वी न्यूरेटिंग माईंड्स अँड बिर्याँड यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलच्या अतिवापराबाबत गंभीर इशारा दिला. मोबाईलच्या अतिवापरामुळे मेंदूमध्ये 'डोपामाइन' सारख्या बक्षीस-संवेदनेशी संबंधित रासायनिक प्रक्रियांना चालना मिळत असल्याने स्क्रीनचा वापर वारंवार करण्याची सवय लागू शकते. विशेषतः तरुण वयात स्क्रीनचा अनियंत्रित वापर मानसिक व शारीरिक आरोग्यावर विपरीत परिणाम करू शकतो, असे त्यांनी सांगितले.रोटेरियन दीपक सोनावणे यांनीही विद्यार्थ्यांना मोबाईलचा अनावश्यक वापर टाळून अभ्यासाबरोबरच मैदानी खेळ, व्यायाम आणि इतर उपक्रमांना वेळ देण्याचे आवाहन केले.

पारंपरिक वाद्यांचा गजर अन् भक्तीचा सलोखा; कवठे परिसरात विघ्नहर्ता गणरायाचे जल्लोषात आगमन!



कवठे प्रतिनिधी धनंजय साळवे

कवठे येमाई : कवठे परिसरात श्री गणेश जयंतीच्या शुभमुहूर्तावर विघ्नहर्ता गणरायाचे अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात आगमन झाले. घरगुती गणपतीसह विविध सार्वजनिक मंडळांनी यंदा डॉल्बी आणि डीजेच्या कर्णकर्कश आवाजाला फाटा देत ढोल-ताशा, झांज आणि टाळ-मृदंगाच्या पारंपरिक गजरात लाडक्या बाप्पाचे स्वागत केले.

?'रडू नको बाळा' फेम शिवानी शिंदेच्या गवळणींनी जिंकली मने

क्रीडांगणे, नवज्योत कला क्रीडा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी आणि सदस्यांनी स्वतः कठोर सराव करून तयार केलेल्या ढोल पथकाच्या साथीने गणरायाची मिरवणूक काढली. या स्वागत ढोल पथकाच्या शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वादनाने समस्त ग्रामस्थांची मने जिंकली.

?कवठे परिसरातील सर्वच लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्व प्रसिद्ध बालकीर्तनकार शिवानी शिंदे हिने यावेळी बहारदार गीते वगवळणी सादर करत गणेशभक्तांना मंत्रमुग्ध केले. तिने सादर केलेल्या 'लाडक्या गनोबा समजून घेशील...' या गीताने उपस्थितांची मने जिंकली. याशिवाय, श्री गणेशाची बैलगाडीतून काढलेली भव्य आगमन मिरवणूक सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.

नवज्योत कला क्रीडा मंडळाच्या ढोल पथकाचा रुबाब

दुसरीकडे, नवज्योत कला क्रीडा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी आणि सदस्यांनी स्वतः कठोर सराव करून तयार केलेल्या ढोल पथकाच्या साथीने गणरायाची मिरवणूक काढली. या स्वागत ढोल पथकाच्या शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वादनाने समस्त ग्रामस्थांची मने जिंकली.

महाराष्ट्रातील घरोघरी पोहोचलेली प्रसिद्ध बालकीर्तनकार शिवानी शिंदे हिने यावेळी बहारदार गीते वगवळणी सादर करत गणेशभक्तांना मंत्रमुग्ध केले. तिने सादर केलेल्या 'लाडक्या गनोबा समजून घेशील...' या गीताने उपस्थितांची मने जिंकली. याशिवाय, श्री गणेशाची आरती, वैभवी लाड,सुप्रिया काळभोर,प्राजक्ता शितोळे,ज्योती गजरे,मंजुश्री निंबाळकर,कोमल साव्रस,रोहिणी धुमाळ उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गौरी वाकचौरे व वेदिका शितोळे या विद्यार्थिनींनी केले. याप्रसंगी आयेशा गुंजाळ,गौरी वेताळ,श्राव्या वाकचौरे,ज्ञानेश्वरी भोसले,रुद्र भोसले,हर्ष कुंभकर्ण,सृष्टी बेनके, राधिका रासकर,सानिका वाकचौरे, सानिका काळभोर,गौरी बेनके, वैष्णवी कोळपे या विद्यार्थिनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी सर्व शिक्षकांचा पुष्प व पेन देऊन सन्मान करण्यात आला.

विद्यालयाचे प्राचार्य बेनके सर यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले ते म्हणाले शिक्षकहा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाला आकार देणारा शिल्पकार असतो.जबाबदार नागरिक बनवणे हे शिक्षकाची खरी भूमिका आहे.

मोर्वे गावात पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली; 'डीजे मुक्त गणेशोत्सव' चा निर्णय



खंडाळा प्रतिनिधी/ गणेश गुरव

पर्यावरणाचे संवर्धन आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने वर्क फॉर इक्वॅलिटी संस्था आणि माध्यमिक विद्यालय, मोर्वे यांच्या संयुक्त विद्यमाने मोरवे गावात पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती रॅली व पथनाट्याचे आयोजन करण्यात आले.

वर्क फॉर इक्वॅलिटी संस्था गेल्या १६ वर्षांपासून महाराष्ट्रातील ग्रामीण भागात जागरूक, जबाबदार आणि संवेदनशील नागरिक घडविण्यासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून सातत्याने काम करत आहे. याच उद्देशातून विद्यार्थ्यांच्या सहभागातून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश ग्रामस्थांपर्यंत पोहोचविण्यात आला.

रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत विविध घोषणा देत ग्रामस्थांमध्ये जनजागृती केली. त्यानंतर सादर करण्यात आलेल्या पथनाट्यात गणेशोत्सवातील पर्यावरणपूरक पर्यायांवर प्रभावीपणे भाष्य करण्यात आले. प्लास्टिक व थर्माकोलचा वापर टाळून सजावटीसाठी नैसर्गिक फुलांचा वापर करावा, डीजेमुळे होणारे ध्वनी प्रदूषण टाळून पारंपरिक वाद्यांचा वापर करावा, तसेच प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीऐवजी शाडूच्या मातीच्या गणेशमूर्तींचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले.

तसेच गणेशमूर्तींचे विसर्जन नदी, विहीर किंवा इतर नैसर्गिक जलस्रोतांमध्ये न करता कृत्रिम विसर्जन हौदामध्ये करावे, असा पर्यावरणपूरक संदेशही पथनाट्यातून देण्यात आला.

या उपक्रमात माध्यमिक विद्यालय, मोर्वे येथील सुमारे १५० विद्यार्थी-विद्यार्थिनी, मुख्याध्यापक गुलदगड सर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ तसेच वर्क फॉर इक्वॅलिटीच्या प्रोग्रॅम मॅनेजर राजश्री रासकर आणि फिल्ड ऑफिसर उर्मिला चव्हाण सहभागी झाले.

यावेळी मुख्याध्यापक गुलदगड सर यांनी मनोगत व्यक्त करताना गावातील विविध ठिकाणी स्वतंत्रपणे गणेशमूर्तींची स्थापना करण्याऐवजी एकाच ठिकाणी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केल्यास प्रदूषण कमी करण्यास मदत होईल, तसेच ग्रामस्थांना एकत्र येऊन उत्सव साजरा करण्याची संधी मिळेल, असे मत व्यक्त केले.

यानंतर ग्रामस्थांनीही पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत आपली मते व्यक्त केली. यंदा मोर्वे गावात गणेश मंडळांच्या माध्यमातून 'डीजे मुक्त गणेशोत्सव' साजरा करण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला. विद्यार्थ्यांनी केलेल्या जनजागृतीला ग्रामस्थांनी सकारात्मक प्रतिसाद देत पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जबाबदारीच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले. अशी माहिती संस्थेच्या प्रोग्रॅम मॅनेजर राजश्री रासकर यांनी दिली.

प्रभाग क्रमांक सहा , सात मध्ये ना फवारणी ना धुवाळणी



प्रभागात डासांचा प्रकोप वाढला, लहान मुले आजारी नगरपंचायत तसेच आरोग्य विभाग गाढ झोपेत



सेलू/ प्रशांत झाडे

नगरपंचायत अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्रमांक सहा आणि सात या प्रभागात डासांचा प्रादुर्भाव वाढत चालला असला तरी नगरपंचायत प्रशासनाकडून ना फवारणी करण्यात आली आणि नाही धुवाळणी करण्यात आली. येवढ्या मोठ्या प्रमाणात टॅक्स वसूल करत असताना मात्र नागरी सुविधा,नागरिकांची काळजी नगरपंचायत ला नसावी का हा संतोषकारक विषय आहे.

सदर प्रभागात डासांचा प्रसार एवढा वाढला आहे की लहान मुलांपासून तर मोठे व्यक्ती आजारी पडत आहे , मात्र नगर पंचायत चे अधिकारी , पदाधिकारी, कर्मचारी यांबाबी कडे लक्ष देण्यास तयार आहे. यंदा पाऊस दमदार न पडल्यामुळे सर्वच सेलू शहरातील प्रभागात डासांचा प्रकोप वाढला आहे ,त्यामुळे आजाराचे प्रमाण सुद्धा वाढले आहे.

नागरिकांनी वारंवार सूचना दिल्या नंतर ही नाही नगरपंचायत जागी होते नाही आरोग्य विभाग, सदर डासांमुळे डेंग्यू सदृश रुग्णांची लागण झाल्यावर जागे होणार का असा संतप्त सवाल येथील प्रभागातील नागरिकांनी व्यक्त केला आहे. संबंधित अधिकारी यांनी सदर बाबीची तत्काळ दखल घेऊन येथील प्रभागात फवारणी आणि धुवाळणी करावी अशी मागणी जोर धरत आहे.

तळेगावात रंगली दोन मोनो रुग्णाच्या मैत्रीची चर्चा



तळेगाव प्रतिनिधी/ राजेंद्र खंडारे तळेगाव श्यामजीपंत हे एक असं गाव आहे की डोंगरात च्या कुशीत वसलेलं त्यात चारही तालुक्याच्या मध्यभागात आणि तिथूनच गेला मुंबई नागपूर नॅशनल हायवे त्याचमुळे तळेगावात वाहतूक आणि जाणार येणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे अचानक पणे दोन मोनो रुग्ण हे दहा महिन्या अगोदर तळेगावात दाखल झाले दाखल झाल्यानंतर दोन्ही मोनो रुग्ण हे वेगवेगळ्या ठिकाणी राहत होते कालांतराण त्यांची दोघांची मैत्री झाली आणि मैत्री एवढी घट्ट झाली की विचारता सोय नाही लोक म्हणत होते की मैत्री ही आपलीच असते पण अचानक पणे जनतेच्या लक्षात आलं की मोनो रुग्ण सुद्धा मैत्रीच्या जाळ्यात अटकत असतो मैत्री अशी घट्ट की कोणत्यांना नाश्ता दिलं तर ते दोघेही अर्ध अर्ध वाटून खातात चाय दिला चाय सुद्धा पैसे दिले तरी दोघं वाटप करतात ही बाब सहा महिन्यापासून कंटिन्यू चालू आहे त्यामुळे या दोन मनोरुग्णांच्या मैत्रीची चर्चा संपूर्ण तळेगाव परिसरामध्ये हवे सारखी पसरलेली आहे

सृजनच्या शिक्षिका मनिषा रविंद्र कात्रे यांना 'आदर्श शिक्षक २०२६' या पुरस्काराने सन्मानित



आरती कारंजेकर

देवळी (प्रतिनिधी) येथील सृजन इंग्लिश मीडियम स्कूलच्या शिक्षिका मनिषा रविंद्र कात्रे यांना शिक्षक दिनानिमित्त आदर्श शिक्षिका म्हणून चंद्रपूर येथे गौरविण्यात आले. 'उत्कृष्ट शिक्षक सन्मान २०२६' हा पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे.

विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, गोविंदराव वंजारी फाउंडेशन व गोविंद मैना फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने चंद्रपूर येथे शिक्षक दिनानिमित्त अनेक आदर्श शिक्षकांचा गौरव करण्यात आला.

याभध्ये सृजन इंग्लिश मीडियम स्कूल देवळीच्या शिक्षिका मनिषा कात्रे मॅडम यांना उत्कृष्ट शिक्षक सन्मान २०२६ या पुरस्काराने गौरविण्यात आले. सदर पुरस्कार चंद्रपूर येथे एका भव्य दिव्य कार्यक्रमात बहाल करण्यात आला. यांची आपल्या सेवेतील शैक्षणिक कार्य, विद्यार्थी प्रियता व समाजासाठी योगदान अशा प्रकारे त्यांच्या कार्याची दखल घेऊन या पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली. सदर पुरस्काराचे वितरण आमदार अभिजीत वंजारी, शिक्षक आमदार सुधाकर अडबाले व मान्यवरांच्या हस्ते चंद्रपूर येथील प्रियदर्शनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृहात करण्यात आले. मनिषा रविंद्र कात्रे यांनी आपल्या यशाचे श्रेय संस्थाचालक श्रीमती डॉ.श्रद्धा चोरे मॅडम व डॉ. प्रशांत चव्हाण सर , मुख्याध्यापक, पालक व इतर ज्येष्ठ व्यक्तींना दिले. त्यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल अनेक सामाजिक संस्थांनी व कर्मचाऱ्यांनी शुभेच्छांचा वर्षाव केला.

दिव्यांगांच्या असहाय्यतेवर 'वसुली'चा वार!

प्रमाणपत्राच्या नावाखाली १० हजारांची कथित वसुली; 'डॉक्टरांच्या नावावर' ५ हजार, नंतर पुन्हा ५ हजार! ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्याने सेलूत खळबळ

सेलू/ प्रशांत झाडे

शासनाच्या योजनांचा आधार मिळावा, या आशेने दिव्यांग प्रमाणपत्रासाठी धडपडणाऱ्या एका असहाय्य दिव्यांगाच्या मजबुरीचाच कथित गैरफायदा घेतल्याचा धक्कादायक प्रकार सेलूत समोर आला आहे. दिव्यांग प्रमाणपत्र व त्यासंबंधित प्रक्रिया करून देण्याच्या नावाखाली तब्बल १० हजार रुपये घेतल्याचा आरोप करण्यात आला असून, त्यानंतरही पैशांसाठी तगादा लावला जात असल्याचे संबंधित दिव्यांगाने सांगितले आहे. त्यातच या प्रकरणाशी संबंधित असल्याचे सांगितली जाणारी ऑडिओ क्लिप समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सेलू येथील संजय कळसाईत यांना अर्धांगवायुचा झटका आल्याने त्यांना चालणेही कठीण झाले आहे. काम करण्याची क्षमता कमी झाल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि उपचारांचा खर्च भागविण्याचे संकट त्यांच्यासमोर आहे. अशा परिस्थितीत दिव्यांग प्रमाणपत्र मिळाल्यास शासनाच्या विविध योजना व आर्थिक मदत मिळू शकते, या अपेक्षेने त्यांनी प्रमाणपत्रासाठी प्रयत्न सुरू केले.

वाचदरम्यान सेलूतील मिश्रा नामक व्यक्ती दिव्यांग प्रमाणपत्राचे काम करून देत असल्याची माहिती मिळाल्यानंतर कळसाईत यांनी त्यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांना वर्धा येथील जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांच्या नावावर ५ हजार रुपये मागण्यात आले आणि आपण ही रक्कम दिल्याचा आरोप कळसाईत यांनी केला आहे.



प्रमाणपत्र मिळाल्यानंतर पुढील प्रक्रिया आणि 'केस करण्याच्या' नावाखाली पुन्हा ५ हजार रुपये घेतल्याचा आरोप करण्यात आला. म्हणजेच प्रमाणपत्राच्या नावाखाली एकुण १० हजार रुपये घेतल्याचे कळसाईत यांचे म्हणणे आहे.

१० हजारांनंतरही 'तगादा' सुरू?

धक्कादायक बाब म्हणजे एवढी रक्कम दिल्यानंतरही आणखी १ हजार रुपयांसाठी तगादा लावला जात असल्याचा आरोप आहे. शासनाकडून दरमहा अनुदानाची रक्कम मिळाल्यानंतरही फोन करून पैशांची मागणी होत असल्याचे कळसाईत यांनी सांगितले. आधीच अर्धांगवायुमुळे त्रस्त असलेल्या या दिव्यांगावर पैशांच्या सततच्या मागणीमुळे मानसिक तणाव वाढल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

संघटनेच्या नावाखाली नेमका काय 'खेळ'?

सेलू शहरातील बाजार रोड परिसरात भाड्याच्या खोलीत कार्यालय थाटून दिव्यांगांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, प्रमाणपत्र काढून देणे आणि शासकीय कामे करून देण्याच्या नावाखाली आर्थिक व्यवहार होत असल्याची चर्चा आहे. संबंधित व्यक्ती दिव्यांग संघटनेचा तालुका पदाधिकारी असल्याचे सांगत असल्याचाही आरोप आहे.

संघटनेच्या नावाचा वापर करून शासकीय यंत्रणेवर दबाव आणला जातो का? दिव्यांग प्रमाणपत्राच्या प्रक्रियेत मध्यस्थ म्हणून आर्थिक व्यवहार केले जातात का? 'डॉक्टरांच्या नावावर' घेतलेली रक्कम नेमकी कुठे जाते? या प्रश्नांची उत्तरे आता प्रशासनाला शोधावी लागणार आहेत.

व्हायरल ऑडिओने वाढवले प्रकरणाचे गांभीर्य

या प्रकरणाशी संबंधित असल्याचा दावा केला जाणारा ऑडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला आहे. त्यातील संभाषणाची सत्यता अधिकृतीत्या स्पष्ट झालेली नसली तरी त्यामध्ये पैशांच्या व्यवहारासंदर्भात चर्चा असल्याची जोरदार चर्चा आहे. त्यामुळे ऑडिओची तांत्रिक तपासणी करून सत्यता पडताळण्याची मागणी होत आहे.

बोनसाई स्पर्धेत लुकेश व-होकर यांचे घवघवीत यश

कोराडी दिलीप येवले:

नागपूर गार्डन क्लबतर्फे आयोजित फ्लॉवर शो व बोनसाई स्पर्धेत कोराडी येथील लुकेश व-होकर यांनी घवघवीत यश संपादन केले. वसंतराव देशपांडे सभागृहात झालेल्या या स्पर्धेत ३५ ते ४० बोनसाईंचा सहभाग होता.

बोनसाई ही केवळ झाडांची लहान आकारातील मांडणी नसून त्यामध्ये वृक्षसंवर्धन, कलात्मकता, संयम आणि सर्जनशीलतेचा सुंदर संगम असतो. या स्पर्धेत १२ इंचांपेक्षा कमी व अधिक अशा दोन गटांत झालेल्या स्पर्धेत व-होकर यांनी १२ इंचांपेक्षा कमी गटात प्रथम व द्वितीय, तर अधिक गटात प्रथम व तृतीय क्रमांक पटकावला.

स्पर्धेचे परीक्षण बोनसाई आर्टिस्ट मंगेश ठवरे व विक्रम परिहार यांनी केले. यशाबद्दल नागपूर गार्डन क्लबचे सचिव समित आदमने, सदस्य नदीम रेहमान व सहसचिव तन्मय गोडघाटे यांनी व-होकर यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर उंब्रजची वाहतूक व्यवस्था सुधारली

सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज पवार यांच्या नियोजनाला यश; प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून पाहणी केल्याने नागरिकांकडून कौतुक

उंब्रज/(अमोल पवार) : उंब्रज शहरातील वाहतूक कोंडीची समस्या लक्षात घेऊन गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर उंब्रज पोलिसांनी केलेल्या नियोजनामुळे शहरातील वाहतूक व्यवस्था काही प्रमाणात सुरळीत होताना दिसत आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतुकीवर लक्ष ठेवण्यात येत असून, त्यांच्या कार्यपद्धतीचे नागरिक तसेच गणेश भक्तांकडून कौतुक होत आहे.

उंब्रज हे सातारा जिल्ह्यातील महत्त्वाचे वाहतूक केंद्र आहे. उंब्रज-पाटण-चिपळूण या कोकणाकडे जाणाऱ्या प्रमुख मार्गामुळे शहरातून स्थानिक वाहनांसह कोकणाकडे जाणाऱ्या आणि कोकणातून येणाऱ्या वाहनांची मोठी वर्दळ असते. त्यामुळे बाजारपेठ, प्रमुख चौक, बसस्थानक परिसर आणि अंतर्गत रस्त्यांवर वाहतुकीचा ताण निर्माण होतो. गणेशोत्सवाच्या काळात या गर्दीत आणखी वाढ होत असल्याने



वाहतूक सुरळीत ठेवणे हे पोलिसांसमोरचे महत्त्वाचे आव्हान ठरते.ही बाब लक्षात घेऊन उंब्रज पोलिसांकडून प्रमुख ठिकाणी वाहतुकीवर लक्ष ठेवण्यात येत आहे. वाहनांची हालचाल सुरळीत व्हावी, गणेश मंडळांचे कार्यकर्ते व भाविकांना अडथळा निर्माण होऊ नये, तसेच बाहेरून येणाऱ्या वाहनांची वाहतूक कही सुरळीत राहावी, यासाठी आवश्यक त्या ठिकाणी नियोजन करण्यात आले आहे.

वाहतूक व्यवस्थेतील सुधारणा करण्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज पवार हे स्वतः दुचाकीवरून शहरातील विविध भागांत फेरफटका मारून परिस्थितीची पाहणी करत असल्याचे दिसून येत आहे. प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून वाहतुकीचा आढावा घेणे, गर्दीच्या ठिकाणी लक्ष ठेवणे आणि आवश्यक त्या उपाययोजना करणे, या कार्यपद्धतीमुळे नागरिकांमध्ये सकारात्मक भावना निर्माण झाली आहे.

गणेशोत्सवाच्या काळात भाविकांना वाहतूक कोंडीचा त्रास होऊ नये, यासाठी पोलिसांकडून सुरू असलेल्या प्रयत्नांचे नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे. सणासुदीच्या काळात वाहतूक व्यवस्थेकडे विशेष लक्ष देणाऱ्या पोलिसांच्या भूमिकेचे गणेश भक्तांकडून कौतुक होत आहे.

उंब्रजमधील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी पोलिसांच्या प्रयत्नांसोबतच नागरिकांनीही सहकार्य करणे गरजेचे आहे. वाहनचालकांनी रस्त्यावर अनावश्यक पार्किंग करू नये, वाहतुकीचे नियम पाळावेत आणि गणेशोत्सवातील गर्दी लक्षात घेऊन सर्वांनी वाहतूक पोलिसांकडून करण्यात आलेले नियोजन महत्त्वाचे ठरत आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांमुळे गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांना दिलासा मिळत असून, पोलिसांच्या कार्यपद्धतीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

DCS MH मोबाईल ॲपद्वारे शेतकरी स्तरावर पीक नोंदणीची सुविधा उपलब्ध.!

योगेश काबळे

गौळ (वार्ताहर) महाराष्ट्र राज्यात केंद्र शासनाच्या DCS MH मोबाईल ॲपद्वारे सहाय्यक स्तरावर पीक नोंदणीचे काम दिनांक ११ ऑगस्ट २०२६ पासून सुरू आहे. पीक पाहणीचे काम अधिक जलद, सुलभ व पारदर्शक पद्धतीने तसेच शेतकऱ्यांच्या सोयीचे होण्यासाठी ॲप्ड मोबाईल ?पमध्ये शेतकरी स्तरावरून पीक नोंदणी करण्याची सुविधा दिनांक ११ सप्टेंबर २०२६ पासून उपलब्ध करून देण्यात आली आहे. (सदर मोबाईल ?पमध्ये आवश्यकतेनुसार अधिक विकसित सुविधा समाविष्ट करून त्याचे अद्ययावत (नवीन) व्हर्जन लवकरच उपलब्ध करून देण्यात येईल).

या सुविधेअंतर्गत आता शेतकरी स्वतःच्या मोबाईलवरून ॲप्ड ?पमध्ये आपला शेतकरी ओळख क्रमांक (ईसी घ्क) प्रविष्ट करून आपल्या शेतातील पिकांची नोंदणी करू शकणार आहेत. शेतकरी ओळख क्रमांकाशी संलग्न असलेल्या सर्व शेतजमिनींची पीक नोंदणी शेतकऱ्यांना या सुविधेद्वारे करता येणार आहे.

शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पिकांची अचूक व वेळेत नोंदणी करणे आवश्यक आहे. पीक नोंदणीची माहिती विविध शासकीय योजना, अनुदान व इतर शासकीय सेवांचा लाभ देण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे राज्यातील सर्व शेतकऱ्यांनी ॲप्ड ?प मोबाईल ?पचा वापर करून आपल्या शेतातील पिकांची नोंदणी शक्य तितक्या लवकर, तसेच आजच करून घ्यावी आणि विविध शासकीय योजना व सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन शासनामार्फत करण्यात येत आहे.

राष्ट्रीय सेवा रत्न सन्मानाने प्रितम गायकी सन्मानित

रक्तदान आणि समाजसेवेतील उल्लेखनीय कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल; अयोध्येतील रक्तदान महोत्सवात केले ३६वे रक्तदान

महात्मा फुले बहुउद्देशीय आरोग्य सेवाभावी संस्था, महाराष्ट्र अंतर्गत कार्यरत महात्मा फुले ब्लड डोनर ग्रुपचे वर्धा जिल्ह्यातील सक्रिय कार्यकर्ते तथा प्रदेश सचिव प्रितम गायकी यांना रक्तदान व समाजसेवा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'राष्ट्रीय सेवा रत्न सन्मान-२०२६' देऊन गौरविण्यात आले.

अयोध्या धाम, उत्तर प्रदेश येथे राम कृष्ण सेवा फाउंडेशन, अयोध्या धाम – उत्तर प्रदेश यांच्या वतीने ११, १२ आणि १३ सप्टेंबर २०२६ दरम्यान तीन दिवसीय राष्ट्रीय रक्तदान महोत्सव व राष्ट्रीय सेवा रत्न सन्मान समारोह-२०२६ आयोजित करण्यात आला आहे. एच.आर. पॅलेस, दर्शन नगर, अयोध्या धाम येथे आयोजित या महोत्सवात देशभरातील रक्तदाते व समाजसेवक सहभागी झाले.

या महोत्सवाचे आणखी एक विशेष वैशिष्ट्य म्हणजे प्रितम गायकी यांनी स्वतः या राष्ट्रीय रक्तदान महोत्सवात रक्तदान करून समाजासमोर आदर्श निर्माण केला. अयोध्येतील या महोत्सवात त्यांनी केलेले रक्तदान हे त्यांच्या जीवनातील ३६वे स्वेच्छा रक्तदान ठरले.प्रितम गायकी हे मागील अनेक वर्षांपासून रक्तदानाच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मदत करण्यासाठी कार्यरत आहेत. रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना रक्तदाते उपलब्ध करून देणे, आपत्कालीन परिस्थितीत मदत करणे तसेच सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणे, या माध्यमातून ते मानवसेवेचे कार्य करीत आहेत.

३६ वेळा रक्तदान करण्यासोबतच रक्तदानाची प्रेरणा इतरांपर्यंत पोहोचविण्याचे कार्यही प्रितम गायकी सातत्याने करत आहेत. त्यांच्या या सेवाभावी कार्याची दखल घेत अयोध्येतील राष्ट्रीय व्यासपीठावर त्यांना 'राष्ट्रीय सेवा रत्न सन्मान' प्रदान करण्यात आला.

'एक छत के नीचे रक्तदान करेंगे, पूरे देश के रक्तदाता' या प्रेरणादायी संदेशाने आयोजित करण्यात आलेल्या या राष्ट्रीय रक्तदान महोत्सवातून रक्तदानाची चळवळ देशभर अधिक व्यापक करण्याचा संदेश देण्यात आला.

प्रितम गायकी यांच्या ३६व्या रक्तदानासह राष्ट्रीय सेवा रत्न सन्मानाची बातमी समोर आल्यानंतर महात्मा फुले बहुउद्देशीय आरोग्य सेवाभावी संस्था, महाराष्ट्र आणि महात्मा फुले ब्लड डोनर ग्रुपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

डॉ. ओमप्रकाश शेटेंच्या निवासस्थानी गोमय गणरायाची प्रतिष्ठापना

बीड दिंदूड / प्रतिनिधि :-

दि. १४ गणेशोत्सव हा केवळ भक्तीचा नव्हे तर सामाजिक प्रबोधनाचा उत्सव आहे, याचा प्रत्यय दिंदूड येथे आला आहे. आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष तथा माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते डॉ. ओमप्रकाश सदाशिवराव शेटे यांच्या दिंदूड येथील 'ओम साई शिल्प' या निवासस्थानी यंदा गोमयापासून बनवलेल्या १०० टक्के इको-फ्रेंडली गणपती बाप्पाची प्रतिष्ठापना देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर यांच्या हस्ते विधिवत पूजा करून मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आली.

ही आकर्षक मूर्ती गावंदरा येथील संपदा गोशाळेतील गायींच्या शेणापासून (गोमय)



साकारण्यात आली आहे. या मूर्तीमध्ये प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) किंवा कोणत्याही रासायनिक रंगाचा वापर करण्यात आलेला नाही. ही मूर्ती पूर्णपणे नैसर्गिक आहे. या मूर्तीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे विसर्जनानंतर ही मूर्ती पाण्यात प्रदूषण करणार नाही, तर थेट मातीत विसर्जित होऊन तिचे नैसर्गिक व सेंद्रिय खतात रूपांतर होणार असल्याची माहिती गोशाळेचे संचालक राम बडे यांनी दिली.

यंदा संपदा गोशाळेने संस्थेच्या अध्यक्षा तथा बालयोग तज्ञ डॉ. सत्यभामा चोले (बडे) यांच्या मार्गदर्शनाखाली अशा १२५ गोमय गणेशमूर्ती बनवल्या असून, काही मूर्तीमध्ये तुळशीच्या बियांचा वापर करण्यात आला आहे.

दिंदूडमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा आदर्श

त्यामुळे विसर्जनानंतर त्या ठिकाणी तुळशीचे रोप उगवणार असून 'मातीतून आला, मातीत मिसळला' हा खरा पर्यावरण रक्षणाचा संदेश समाजात जात आहे.

डॉ. शेटे यांच्या या पर्यावरणपूरक निर्णयाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, त्यांनी 'विकास हीच जात, विकास हाच धर्म' या विचारासोबतच 'पर्यावरण हाच देव' हा नवा संदेश दिला आहे. यावेळी खोलेश्वर मल्टीस्टेट चे विलास पारेकर, हभप दशरथ महाराज तिडके, पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे, संतोष स्वामी, नागेश वखरे, नागेश कानडे, नाथा हंगरगे, राम डोरमारे

गणपती बाप्पा आपल्याला निसर्गाशी जोडतो. पीओपीच्या मूर्तींमुळे नदी, तलाव प्रदूषित होतात. आपण जर शाडू मातीचा किंवा गोमयाचा गणपती बसवला, तर आपण खऱ्या अर्थाने पर्यावरणाचे रक्षण करतो. माझ्या सर्व कार्यकर्त्यांना आणि जनतेला माझे आवाहन आहे की, यंदा पर्यावरणपूरक गणपती बसवून एक आदर्श निर्माण करूया.

- डॉ. ओमप्रकाश शेटे (अध्यक्ष, आयुष्मान भारत मिशन, महाराष्ट्र समिती)

आदी उपस्थित होते.

सेलूच्या 'बारभाई' सार्वजनिक गणेशोत्सवाला १२७ वर्षांची परंपरा

?लोकमान्य टिळकांच्या हस्ते झाली होती स्थापना
?मुर्ती देण्याकरिता २०३५ पर्यत बुकिंग

सेलू/ प्रशांत झाडे

सेलू लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या हस्ते सन १८९९ मध्ये स्थापना करण्यात आलेल्या येथील 'बारभाई' गणेश मंडळाच्या सार्वजनिक गणेशोत्सवाला १२७ वर्षाची परंपरा आहे.

यंदाही येथे मोठ्या उत्साहात वाजतगाजत गणरायाची स्थापना करण्यात आली.

गणेशोत्सव काळात येथे विविध प्रकारच्या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

सेलू शहरात एकमेव सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जातो. येथील 'बारभाई' गणेश मंडळाच्या उत्सवाचे हे १२७ वे वर्ष आहे. येथील गणेशोत्सवासाठी बाप्पाची मूर्ती देण्याकरीता सभासदांना जवळपास २०३५ वर्ष वाट बघावी लागते. यावर्षी मंडळाचे सदस्य भंडारी परिवार यांना बाप्पाची मूर्ती देण्याचा मान मिळाला आहे. पुढील वर्षीच्या गणेशोत्सवासाठी मंडळाचे सदस्य राजेंद्र राठि यांच्याकडून बाप्पाची मूर्ती देण्यात येणार असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी यावेळी दिली. गणेशोत्सव काळात येथे विविध स्पर्धा तसेच धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असते. आयोजनासाठी मंडळाचे अध्यक्ष सव्यम भंडारी उपाध्यक्ष जयेश जवस्वाल नरेंद्र अग्रवाल, सौरभ सराफ, पवन राठी, शेखर राठी, अनिल चौधरी, शैलेंद्र दफ्तरी, ब्रिजकिशोर मिश्रा, वरुण दफ्तरी , योगेंद्र राठी, वैभव चौधरी, त्रिशूल चौधरी, जैनेंद्र दफ्तरी, युवराज राठी, अक्षय बेदमोहता, पंचारिया आदी सदस्य सहकार्य करीत आहे.

गावागावांत सार्वजनिक गणेशोत्सवाची स्थापना सुरु असताना १८९९ साली सेलूमध्ये लोकमान्य टिळकांच्या हस्ते प्रथमतः गणेशाची स्थापना करण्यात आली. आज १२७ वर्षानंतरही ही परंपरा कायम आहे. या ठिकाणी बाप्पांची मूर्ती द्यायचे म्हटल्यास तब्बल १० वर्ष प्रतीक्षा करावी लागत आहे. अनेकांनी आधीच नोंदणी करुन ठेवलेली आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी स्वतः सेलूमध्ये येऊन वेगवेगळ्या समाजातील लोकांना एकत्रित करून १८९९ मध्ये बारभाई गणेश मंडळाची स्थापना केली होती.



बॉक्स :२०३५ पर्यंत बुकिंग :

बाप्पाची मुर्ती देणारे मानकरी

भंडारी परिवार १२७,योगेंद्र राठि १२८,नरेंद्रजी सारस्वात १२९,राजेंद्र मिश्रा १३०,सुरभी आकाश भुतडा १३१,तुषार राठि दुर्ग १३२,हर्षल टावरी नागपुर१३३,राजेंद्र सराफ १३४,पियुष अभय वैद्य १३५ पर्यत बाप्पाची मूर्ती देण्याचा मान यांचा आहे.

चौथ्या वर्गातशिकणाऱ्या विभिज्ञा पाचपोर ने बनवला मातीचा गणपती

तळेगाव प्रतिनिधी /राजेंद्र खंडारे

आष्टी तालुक्यातील तळेगाव श्यामजीपंत काकडदरा येतील चौथीत शिकणारी अभिज्ञा विपिन पाचपोर वय वर्ष ९ हे तळेगाव काकडदरा येथील साधारण कुटुंबात जन्मलेली पण तिला एक कलाकृती बनवण्याचा छंद तिला जडला आणि तो शंद पाहून तिचे वडील विपिन पाचपोर हे सुद्धा हरतहून तिची जिद्द पुरी केली तिला तिच्या वडिलांनी सुद्धा साथ दिला माती गोळा करून तिने गणेश चतुर्थीच्या दिवशी एक मातीचा गणपती तयार केला या छोट्याशा मुलीची गावभरामध्ये चर्चा होत आहे आणि तो तिने बनवलेला गणपती स्वतः घरी बसवण्याचा हट्ट केला आणि तिच्या वडिलांनी व आईने गणेश चतुर्थीच्या दिवशी त्याचं मातीच्या गणरायाचं आगमन करण्यात आलं लोकांना संदेश देत आहे की मातीच्या गणपतीच बसवा कारण की तो पाण्यामध्ये विरघळतो जेणेकरून नदीपात्रामध्ये कोणतेही प्रकारची घाण होणार नाही याचे दक्षता घेत आम्ही हा गणपती बसवला तुम्ही सुद्धा मातीचा गणपती बसवाव असं विभिज्ञा पाचपोर हिने जनतेला संदेश दिला



जिल्हाधिकारी शेताच्या बांधावर



सेलू/ प्रशांत झाडे

वर्धा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी श्रीमती वाल्मथी सी. मॅडम यांनी आज, दिनांक १३ सप्टेंबर २०२६ रोजी सेलू तालुक्यातील मौजा कान्हापूर येथे प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या शेताच्या बांधावर जाऊन सोयाबीन, कापूस आणि तूर पिकांच्या सद्यस्थितीची पाहणी केली. चालू हंगामातील पिकांची वाढ, कीड-रोगांचा प्रादुर्भाव आणि पावसाची स्थिती या पार्श्वभूमीवर त्यांनी थेट शेतात उतरून पिकांची सविस्तर माहिती घेतली. ?पाहणी दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थित शेतकऱ्यांशी चर्चा करून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी यावर्षी अलनिनोच्या प्रादुर्भावामुळे पावसाच्या अनियमिततेचे प्रमाण वाढलेले असून पिकावर परिणाम होण्याची शक्यता वर्तविली तसेच सेलू तालुक्यामध्ये २० ते २५ दिवसांचा पावसाचा खंड पडल्यामुळे सोयाबीन पिकाचे शेंग धरण्याचे प्रमाण २५ ते ३० टक्यांनी घटल्यामुळे उत्पादनात ३० ते ३५ टक्के घट होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी मा. जिल्हाधिकारी मॅडम यांना सांगितले. यावेळी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी पिकांच्या नुकसानीवर व किडीच्या नियंत्रणासाठी शेतकऱ्यांना बेळेवर तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध दिल्याचे सांगितले. त्यांनी नैसर्गिक चढ-उतारामुळे पिकांवर होणाऱ्या परिणामांवर लक्ष ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या.

नुकसान भरपाई मिळणार काय?

रिमझिम पाऊस त्यातच तापमानात उकाडा असल्याने सोयाबीन पिकात उत्पन्नात घट येण्याची शक्यता वर्तविल्या जात असताना काही प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही तरी शेतकऱ्यांना या भेटी मुळे दिलासा मिळण्याची आशा वाढली आहे पण इ पिक पाहणी अजून पर्यंत पूर्ण झाली नसल्याचे शेतकरी सांगत आहे

?या क्षेत्रीय पाहणी दौऱ्यावेळी श्री मोटवानी, सहा. जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वर्धा(प्रो.), डॉ. पराजे मॅडम तहसीलदार, सेलू, श्री आर टी राऊत तालुका कृषी अधिकारी सेलू, श्री पिसुड्डे मंडळ अधिकारी सिंदी, श्री काळे उप कृषी अधिकारी सेलू श्री राठोड उप कृषी अधिकारी सिंदी, श्री धमाने सहायक कृषी अधिकारी सुरगाव, श्रीमती कडू ग्राम महसूल अधिकारी सुरगाव तसेच गावातील शेतकरी उपस्थित होते. जिल्हा प्रशासनाने थेट बांधावर येऊन पिकांची पाहणी केल्याबद्दल परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

पर्यावरणपूरक विसर्जन कुंड व निर्माल्य रथांचे लोकार्पण



महापौर निता ठाकरे यांनी दाखविली निर्माल्य रथांना हिरवी झेंडी

नागपूर दिलीप वेवले:-

नागपूर महानगरपालिकेने शहरात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी शहरात ४१९ कृत्रिम विसर्जन कुंडांची निर्मिती केली आहे. या विसर्जन कुंडांचे लोकार्पण महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते फुटाळा तलाव परिसरात झाले. त्याचप्रमाणे गणेशोत्सव काळात जमा होणारे निर्माल्याचे संकलन करण्यासाठी मनपाने १८ निर्माल्य रथ तयार केले आहेत. या निर्माल्य रथांना सुद्धा महापौर निता ठाकरे यांनी मनपाच्या मुख्यालयात हिरवी झेंडी दाखविली.

मनपाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीच्या परिसरात आज (ता. १४) निर्माल्य संकलनातून पर्यावरण व्यवस्थापन लोकजागृती अभियानाअंतर्गत निर्माल्य रथांना हिरवी झेंडी दाखवून महापौर निता ठाकरे यांनी लोकार्पण केले. यावेळी उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, आरोग्य समितीच्या सभापती मनीषा अतकरे, आयुक्त डॉ. विपीन, नगरसेवक योगेश पाचपोर, नगरसेवक अभिजीत झा, अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम एम. उपायुक्त राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी स्वप्नील लोखंडे उपस्थित होते.

शहरात गणेशोत्सवाचे आगमन झाल्यानंतर गणेश विसर्जन पर्यावरणपूरक पद्धतीने व्हावे, यासाठी मनपाचे शहरातील विविध ठिकाणी ४१९ वर कृत्रिम तलाव तयार केले आहेत. मोठ्या आकाराच्या गणेशाच्या मूर्तीच्या विसर्जनासाठी गोरेवाडा, पोलीस लाईन टाकळी, लकडगंज भागातील कच्छी विसावा कोराडी येथे मोठे तलाव बांधले आहेत. परंतु श्री गणेशाच्या लहान मूर्तीच्या विसर्जनासाठी शहरात विविध भागात कृत्रिम तलाव तयार केले आहेत.

ऐतिहासिक परंपरेनुसार सिनियर भोंसला पॅलेस येथे श्री गणरायाची पालखीतून आगमन व प्रतिष्ठापना



नागपूर /दिलीप वेवले

इसवी सन १७२८ पासून ऐतिहासिक आणि पारंपरिक वारसा जपत नागपूर महाराज राजे मुधोजी भोंसले यांच्या नागपूर येथील सिनियर भोंसला पॅलेस या निवासस्थानी यंदा २९८ व्या वर्षी श्री गणरायाचे पारंपरिक पद्धतीने पालखीतून आगमन झाले. विधिवत पूजाअर्चा व धार्मिक विधी पार पाडून श्री गणपती बाप्पांची प्रतिष्ठापना करण्यात आली.

नागपूरच्या राजघराण्याची समृद्ध परंपरा, संस्कृती आणि धार्मिक वारसा जपणारा हा सोहळा भक्तिभावाने आणि उत्साहात पार पडला. या ऐतिहासिक परंपरेचे जतन करत दरवर्षी श्री गणरायाचे आगमन पारंपरिक पद्धतीने केले जाते. सिनियर भोंसला पॅलेस येथील गणपती बाप्पांचे वैशिष्ट्ये श्री गणरायाचे पारंपरिक पद्धतीने पालखीतून आगमन केले जाते. गणपती बाप्पांना नागपूर राजघराण्याच्या परंपरेनुसार विशेष पगडी परिधान केली जाते. मागील २९८ वर्षांपासून गणपती बाप्पांच्या मूर्तीचा रंग आणि आकाराची परंपरा कायम राखली जात असल्याचे सांगितले जाते. गेल्या २९८ वर्षांपासून एकाचा रंगाचा, एकाचा आकाराच्या गणपती बाप्पांच्या मूर्तीची उंची आणि स्वरूपात सातत्य जपले जात आहे.

नविन बिना बौद्ध विहारात तान्हा पोळा उत्साहात साजरा

नविन बिना बौद्ध विहारात तान्हा पोळा उत्साहात साजरा

खापरखेडा / दिलीप वेवले

स्थानिक भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ आणि राहुल नवयुवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने नविन बिना बौद्ध विहारात तान्हा पोळा उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरवात तथागत गौतम बुद्धाच्या छायाचित्राला, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यागमूर्ती माता रमाई यांच्या पूर्ण पुतळ्यांना माल्यार्पण व बुद्ध वंदनेने करण्यात आली. भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष प्रा. डॉ. जितेंद्र सावजी ताराडे यांनी तान्हा पोळ्याचा सण हा आपल्या संस्कृती, जपणूक करणारा असून बाल मनावर कृषि प्रधान भारत देशाची छबी निर्माण करणारा आहे, असे मत व्यक्त केले. यावेळी नंदा सोमकूंवर यांनी पोळा गीते सादर केलीत. सल्लागार समितीचे तुकडोराम बागडे, मनोहर गजभिये, कृष्णाजी वासनिक, भैय्याजी सोनटक्के, ओमप्रकाश गौरकर, किशोर चव्हाण यांच्याहस्ते विविध वेशभूषेत लाकडी बैल घेवून उपस्थित लहान मुलांना खाऊ वाटप करून तान्हा पोळा फोडण्यात आला. याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे उपाध्यक्ष अनिल लांजेवार, सचिव मुकेश बागडे, कोषाध्यक्ष रविंद्र ढोके, आनंद वासनिक, संकेत वाहने, बॉबी गणविर, सम्यक ताराडे, निर्भय वासनिक, तनिष्क वासनिक, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळाच्या कांता बागडे, अंजना मेश्राम, कुसुम गौरकर, बेबी वासनिक, राधा गौरकर, प्रभा लोखंडे, कांता गोलाईत, रेखा लांजेवार, सत्यभामा वासनिक, सत्यफुला कांबळे, वंदना गणविर, सारिका ताराडे, कल्पना वासनिक, प्रिती गोलाईत, रोहिणी धनवटे, आशा गौरकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन ज्ञानेश्वर ढोके तर आभार सोनू गणविर यांनी मानले.



शेतकऱ्यांच्या पोळा सण उत्साहात साजरा



नागपूर / दिलीप वेवले

महाराष्ट्राचा लोकप्रिय सण म्हणजे पोळा विविध नटलेले रूढी, परंपरा जोपासत सर्वांचा अन्नदाता शेतकरी राजा यांच्या सण पोळा मोठ्या उत्साह व आनंदात साजरा करण्यात आला. बैलांना सजवून वाजत गाजत बाजार चौकात आणले. सर्व एकत्र जमले जमलेल्या लोकांनी विधीवत पूजन केले. उपस्थितांनी महादेवाची गाणे म्हटली बाजार चौक विविध दुकानांनी सजलेला होता.

लहान बालगोपाल बाजारात विविध सामानाची खरेदी करत होते. नागपूर येथील प्रगशिल शेतकरी दिनकर राऊत हस्ते पुजन केले. पोळा सुटल्या व सर्वजण आप आपल्या घरी जाऊन बैलांना नैवेद्य देऊन मनोभावनेने पुजा, अर्चना केली.

कामठी चा राजा चे आगमन

कामठी/ दिलीप वेवले

दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा वाजत गाजत श्री सदाशिवराव पाटील शिक्षण संस्था कामठी येथील शैक्षणिक परिसरात आज दिनांक १४ सप्टेंबर २०२६ ला कामठीच्या राजाचे आगमन झाले.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती किशोरीताई भोयर, संस्थेचे सचिव श्री सुरेश भाऊ भोयर, संस्थेचे कार्यकारी संचालक श्री अनुराग भोयर यांच्या उपस्थितीत कामठी फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मिलिंद उमेकर यांनी विधिवत पूजा करून गणेश मूर्तीची स्थापना केली.



बोरधरण प्रकल्पग्रस्तांच्या मोबदल्याबाबत सुनावणीत सकारात्मक चर्चा

१०५ कोटी २७ लाख रुपयांच्या निधीचा प्रश्न; दहा वर्षांच्या संघर्षाची दखल



सेलू/ प्रशांत झाडे

बोरधरण प्रकल्पग्रस्तांच्या मोबदल्यासंदर्भात नुकत्याच झालेल्या सुनावणीत सकारात्मक चर्चा झाल्याचे समोर आले आहे. बोर व्याघ्र प्रकल्पाचे सहाय्यक वनसंरक्षक तथा प्रथम अपिलीय अधिकारी आशिष उज्वलराव देशमुख यांच्या उपस्थितीत ही सुनावणी पार पडली.

बोरधरण प्रकल्पग्रस्त संघटनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर तुकाराम मेश्राम, रा. उचेगाव, ता. दारव्हा, जि. यवतमाळ हे मागील दहा वर्षांपासून बोरधरण प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांचा सूक्ष्म अभ्यास करून सातत्याने संघर्ष करीत आहेत.

संबंधित वरिष्ठ विभागांकडे लेखी तक्रारी, विनंती अर्ज तसेच विविध मागण्यांच्या माध्यमातून ते सातत्याने पाठपुरावा करीत असून, संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडूनही त्यांना कायदेशीर व प्रशासकीय स्वरूपात उत्तरे दिली जात आहेत. याच अनुषंगाने जिल्हाधिकारी वर्धा यांनी दिलेल्या लेखी आदेशानुसार बोर व्याघ्र प्रकल्पाचे सहाय्यक वनसंरक्षक आशिष उज्वलराव देशमुख, प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, कोर क्षेत्र, बोर व्याघ्र प्रकल्प, वर्धा यांच्या समक्ष सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीदरम्यान बोरधरण प्रकल्पग्रस्तांच्या १०५ कोटी २७ लाख रुपयांच्या निधीच्या प्रस्तावर चर्चा करण्यात आली. जिल्हाधिकारी वर्धा यांच्या लेखी आदेशासह नागपूर येथील प्रादेशिक उपायुक्त यांच्या स्तरावरून झालेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने बोर प्रकल्पग्रस्तांच्या आठही गावांतील नागपूर व वर्धा जिल्ह्यातील हजारो गरीब प्रकल्पग्रस्त कुटुंबांच्या परिस्थितीचा विचार करण्यात आला.

गेल्या दहा वर्षांपासून सूर्योदय संघटनेच्या माध्यमातून प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांसाठी सुरू असलेल्या संघर्षाची दखल घेत, नुकत्याच झालेल्या सुनावणीत सहाय्यक वनसंरक्षक देशमुख यांनी मोबदल्याच्या प्रस्तावर सकारात्मक भूमिका घेत चर्चा केल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

या सुनावणीस संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ज्ञानेश्वर मेश्राम, राष्ट्रीय सल्लागार शंकर पानबुडे, राष्ट्रीय सहसचिव दिलीप राजेंद्र मेश्राम यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रकल्पग्रस्तांच्या हक्काचा मोबदला मिळण्यासाठी गेल्या दशकभरापासून सुरू असलेल्या पाठपुराव्याला सकारात्मक चर्चेमुळे नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

व्यवसाय व्यवस्थापन विभागात प्री-पीएचडी कोर्सवर्क



अधिसभा सदस्य श्री. विष्णू चांगदे व अॅड.मनमोहन बाजपेयी यांच्या उपस्थितीत उद्घाटन

नागपूर /दिलीप वेवले

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर व्यवसाय व्यवस्थापन विभागात प्री-पीएचडी कोर्सवर्कचे आयोजन सोमवार, दि. ७ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर २०२६ दरम्यान करण्यात आले आहे.? प्री-पीएचडी कोर्सवर्कचा उद्घाटन कार्यक्रम अधिसभा सदस्य विष्णू चांगदे व ?ड. मनमोहन बाजपेयी यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी पार पडला. कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमाला वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. मेधा कानेटकर, अधिसभा सदस्य विष्णू चांगदे, अॅड. मनमोहन बाजपेयी, विभाग प्रमुख डॉ. राहुल खराबे यांची उपस्थिती होती. अधिसभा सदस्य श्री.विष्णू चांगदे यांनी पीएचडी प्रवेश पात्र विद्यार्थ्यांसाठी ६ क्रेडिटच्या प्री-पीएचडी कोर्सवर्कचे आयोजन करण्यात आल्याने या उपक्रमाचे स्वागत केले. विद्यापीठ परिक्षेत्रात विद्यार्थ्यांना अधिकाधिक संशोधनाची संधी प्राप्त व्हावी याकरिता अधिसभेत प्री-पीएचडी कोर्सवर्कचे आयोजन करण्याबाबत मागणी करण्यात आली होती. या अनुषंगाने विभागाच्या वतीने प्री-पीएचडी कोर्सवर्कचे आयोजन केल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी सामाजिक दायित्व लक्षात घेत समाजपयोगी संशोधन करण्याचे आवाहन त्यांनी केले. अधिसभा सदस्य अॅड. मनमोहन बाजपेयी यांनी मार्गदर्शन करताना विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना संशोधनासाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिला जात असल्याची माहिती दिली. विद्यापीठाच्या सुविधेचा लाभ घेत विद्यार्थ्यांनी संशोधन संशोधन करावे असे आवाहन त्यांनी केले.

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. मेधा कानेटकर यांनी ६ क्रेडिटच्या प्री-पीएचडी कोर्सवर्कचे योग्य नियोजन केल्याने विभागाचे अभिनंदन केले. या कोर्सवर्कचा संशोधन कार्यात विद्यार्थ्यांना उपयोग होईल. तसेच विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक करताना विभाग प्रमुख डॉ. राहुल खराबे यांनी कोर्सवर्क आयोजन करण्याबाबत माहिती दिली. संशोधन कार्यात कोर्सवर्कचे महत्व त्यांनी आपल्या प्रास्ताविकेतून पटवून दिले. उद्घाटनानंतर कार्यक्रमाचे संचालन डॉ. शिल्पा सोनटक्के यांनी केले तर आभार विभाग प्रमुख डॉ. राहुल खराबे यांनी मानले. प्री-पीएचडी कोर्सवर्क दरम्यान दररोज साधारणतः चार सत्र होणार असून एकूण ४०-४५ सत्राचे आयोजन केले जाणार आहे.

लॅबग्रोन डायमंड उद्योगात भारताचे जागतिक नेतृत्व; नवी मुंबईत जेम्स अँड ज्वेलरी पार्क - केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह

मुंबई : प्रयोगशाळेत विकसित होणाऱ्या हिऱ्यांच्या (लॅबग्रोन डायमंड) निर्मितीसाठी आवश्यक यंत्रसामग्रीपासून दागिन्यांचे उत्पादन, ब्रँडिंग, शोरूम आणि जागतिक विक्री व्यवस्थेपर्यंतची संपूर्ण मूल्यसाखळी भारतात उभारावी. या उद्योन्मुख क्षेत्रात भारतीय उद्योगाने जागतिक नेतृत्व प्रस्थापित करावे, असे आवाहन केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी केले.

भारतातील रत्न व आभूषण उद्योगातील उत्कृष्टता, नेतृत्व आणि उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करणारा ५ २ वा 'इंडिया जेम्स अँड ज्वेलरी अवॉर्ड्स' सोहळा मुंबईत आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात केंद्रीय मंत्री अमित शाह प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, पणन मंत्री जयकुमार रावल, खासदार गोविंद ढोलकिया, आमदार अमित साटम आणि कौन्सिलचे अध्यक्ष किरीट भन्साली यांची प्रमुख उपस्थिती होती. यांच्यासह रत्न व आभूषण क्षेत्रातील उद्योजक, निर्यातदार, उत्पादक, बँकर्स, महिला उद्योजक आणि विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री शाह म्हणाले की, भारताकडे पायाभूत सुविधा, ऊर्जा, भांडवल आणि उद्यमशील व्यापारी वर्गाचे सामर्थ्य आहे. लॅबग्रोन डायमंडची जागतिक बाजारपेठ आगामी काळात मोठ्या प्रमाणात विस्तारण्याची शक्यता



आहे. त्यामुळे या क्षेत्रातील संधी ओळखून भारतीय उद्योगाने केवळ कामाची गतीच नव्हे, तर व्यवसायाची व्याप्तीही वाढवावी. भारतीय कंपन्यांनी जागतिक ब्रँड निर्माण करून प्रमुख शहरांमध्ये स्वतःची विक्री केंद्रे उभारावीत, यासाठी केंद्र सरकार आवश्यक ते सर्व सहकार्य करेल. रत्न व आभूषण उद्योगासाठी नवी मुंबईत मोठी जागा आणि आवश्यक एफएसआय उपलब्ध करून देण्याची भूमिका मांडली आहे. हा उद्योग महाराष्ट्राबाहेर जाऊ नये, यासाठी राज्य सरकार सर्वतोपरी मदत करण्यास कटिबद्ध असल्याचेही केंद्रीय मंत्री शाह यांनी सांगितले.

भारताला रत्न व आभूषण व्यापाराची प्राचीन परंपरा

भारताची रत्ने आणि आभूषणे ही हजारो वर्षांपासून जगभरातील ओळख आहे. सुमारे सहा हजार वर्षांपूर्वीपासून भारतातून रत्ने व आभूषणांचा व्यापार होत असल्याचे नमूद करून केंद्रीय मंत्री शाह म्हणाले की, मध्ययुगीन काळात राजाश्रयामुळे जडजवाहीर आणि आभूषण कलेला नवी उंची मिळाली. कुंदन, मीनाकारी यांसारख्या कलांचा विकास झाला. जयपूरची ओळख आजही रंगीत रत्नांची जागतिक राजधानी म्हणून आहे.

जगभरात पैलू पाडल्या जाणाऱ्या प्रत्येक दहा हिऱ्यांपैकी नऊ हिऱ्यांवर सुरतमध्ये प्रक्रिया होते. सुरतच्या हिरे उद्योगाने लाखो नागरिकांना रोजगार आणि आत्मनिर्भरता दिली असून, देशाच्या अर्थव्यवस्थेत व निर्यातीत मोठे योगदान दिले आहे. मुंबईनेही रत्न व आभूषण व्यापाराला निर्यातीची महत्त्वाची धुरा बनविले आहे. भारत डायमंड बोर्स हे भारतीय रत्न व आभूषण उद्योगच्या जागतिक साम्यर्थाचे प्रतीक ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

निर्यात २ लाख ४४ हजार कोटी रुपयांवर

वर्ष २०२५ मध्ये भारताची रत्न व आभूषण निर्यात २ लाख ४४ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. देशाच्या एकूण व्यापारी माल निर्यातीत या क्षेत्राचा वाटा ६.३ टक्के आहे. या उद्योगातून सुमारे ७५ लाख नागरिकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार मिळत आहे.

एक लाख कोटींची गुंतवणूक आणि ५० हजार रोजगारांची अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 'इंडिया जेम्स अँड ज्वेलरी अवॉर्ड्स'मध्ये उद्योगातील उल्लेखनीय योगदानाचा गौरव

अमेरिका, मध्यपूर्व, हाँगकाँग आणि युरोपसाठी भारत हा आभूषणांचा महत्त्वाचा पुरवठादार ठरला आहे.

भारत जगातील ९० टक्क्यांहून अधिक कटिंग आणि पॉलिशिंग केलेल्या हिऱ्यांवर प्रक्रिया करतो. हे भारतीय उद्योजकांच्या साहसाचे आणि कौशल्याचे उत्तम उदाहरण आहे. यूरोपियन युनियन, संयुक्त अरब अमिराती, ऑस्ट्रेलिया, ओमान आणि युनायटेड किंगडमसोबत झालेल्या मुक्त व्यापार करारांचा उपयोग करून उद्योगाने नव्या बाजारपेठा आणि व्यावसायिक संधी शोधाव्यात, असेही शाह यांनी सांगितले.

विशेष अधिसूचित क्षेत्रात रफ डायमंडचा व्यापार करणाऱ्या कंपन्यांना प्राप्तिकरातील दीर्घकालीन सवलत देण्याच्या निर्णयामुळे भारताला जगातील रफ डायमंड ट्रेडिंग हब बनविण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण सुरुवात झाल्याचे ते म्हणाले. पायाभूत सुविधा, उत्पादनाला प्रोत्साहन देणाऱ्या योजना आणि निर्यातवाढीसाठी उपलब्ध सुविधांमुळे भारत वेगाने प्रगती करीत आहे. वर्ष २०४० पर्यंत भारताला प्रत्येक क्षेत्रात जगातील अग्रणी राष्ट्र बनविण्याच्या संकल्पात रत्न व आभूषण उद्योगाने महत्त्वाची भूमिका बजावावी, असे आवाहनही केंद्रीय मंत्री शाह यांनी केले.

नवी मुंबईतील जेम्स अँड ज्वेलरी पार्कमुळे एक लाख कोटींची गुंतवणूक, ५० हजार रोजगार अपेक्षित– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

देशाच्या निर्यातीत तसेच आर्थिक विकासात रत्न व आभूषण उद्योगाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. या उद्योगाला पायाभूत सुविधा, आधुनिक तंत्रज्ञान आणि सुलभ दळणवळणाची जोड देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. नवी मुंबई येथे उभारण्यात येणाऱ्या अत्याधुनिक जेम्स अँड ज्वेलरी पार्कमधून सुमारे एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ५० हजार रोजगार निर्माण होतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारताच्या रत्न व आभूषण निर्यातीत मुंबई आणि महाराष्ट्राचा सर्वाधिक वाटा आहे. भारत डायमंड बोर्सने निर्माण केलेल्या सक्षम परिसंस्थेमुळे या उद्योगाच्या वाढीला मोठी चालना मिळाली आहे. या टिकाणी दरवेज सुमारे ३० ते ३५ हजार व्यापारी, कारागीर आणि कर्मचारी एका कुटुंबाप्रमाणे कार्यरत असतात. त्यांच्या परिश्रमामुळे या क्षेत्राचा व्यापार २१ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचला असून, त्यात सातत्याने वाढ होत आहे.

डीजेच्या दणदणाटाला पोलिसांच्या कारवाईचा दणका

जिल्ह्यातील पहिला गुन्हा सिंदी (रेल्वे) तान्हा पोळ्यात ध्वनीप्रदूषणाचा नियमभंग नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल, डीजे जप्तीची कारवाई

वर्धा : तान्हा पोळा उत्सवादरम्यान ध्वनीप्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या डीजे मालकांसह मंडळांच्या पदाधिकाऱ्यांविरुद्ध सिंदी (रेल्वे) पोलिसांनी कारवाई केली. वर्धा जिल्ह्यात डीजेविरोधात पहिला गुन्हा सिंदी रेल्वे पोलिस ठाण्यात दाखल झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणी नऊ जणांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून संबंधित डीजे जप्त करण्याची कारवाई केली जाणार आहे.

तान्हा पोळ्याच्या पार्श्वभूमीवर ध्वनीप्रदूषणाला आळा घालण्यासाठी पोलिसांनी मंडळांचे पदाधिकारी व डीजेधारकांची बैठक घेऊन नियमांची माहिती दिली होती. ध्वनीक्षेपक वापरण्यास अटी व शर्तींसह परवानगी देण्यात आली होती. तसेच लेझर लाईटच्या वापरावर जिल्हाधिकाऱ्यांनी प्रतिबंधात्मक आदेश जारी केला होता. उत्सवाच्या दिवशी पोलिसांच्या विशेष पथकाने विविध मंडळांजवळ जाऊन डीजेच्या आवाजाची डेसिबल पातळी तपासली. काही मंडळांनी नियमांचे पालन केले; मात्र काही ठिकाणी निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक आवाज तसेच प्रतिबंधित लेझर लाईटचा वापर झाल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्याबाबत पंचनामे करण्यात आले.

या प्रकरणी साई केजीएन डीजेचे मालक सौरभ नेवारे, अमेरिकन मंडळाचे पदाधिकारी सिद्धार्थ डंभारे, चांदताग धुमाल डीजेचे मालक सोनू बघेल, गणेश दुम्मलवार, गुरुनानक धुमाल पार्टीचे मालक करण बावणे, समाज मित्र परिवाराचे पदाधिकारी अजय बावणे, लष्कर धुमाल डीजेचे मालक मो. अवरार, मित्र परिवार सिंदी रेल्वेचे मिलिंद बेलखोडे आणि सूरज काटोले यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, संबंधितांनी ध्वनीप्रदूषण नियम, प्रतिबंधात्मक आदेश, पोलिसांच्या नोटिसा तसेच डीजे वापराच्या परवानगीतील अटी व शर्तींचे पालन केले नसल्याचा आरोप आहे. याप्रकरणी सिंदी रेल्वे पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता व महाराष्ट्र पोलिस अधिनियमातील संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ध्वनीप्रदूषणाची पातळी प्रतिपत्रणासाठी विशेष पथक नियुक्त करण्यात आले होते. उत्सवापूर्वी शांततेच्या कालावधीतही संबंधित भागातील ध्वनीपातळीचे नमुने घेऊन पंचनामे करण्यात आले होते.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे व उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार नरेंद्र निस्वादे, पोलिस उपनिरीक्षक ओम कलेगुरवार व पोलिस कर्मचाऱ्यांनी केली.

आगामी काळात सण-उत्सव तसेच खासगी कार्यक्रमांमध्ये ध्वनीप्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन झाल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

ध्वनिप्रदूषण, लेझर शो व रस्त्यांवरील अडथळे टाळा

सामाजिक संघटनांचे जिल्हा प्रशासनाला निवेदन



वर्धा : गणेशोत्सव, नवरात्रोत्सव यासह सर्व धर्मीय सणोत्सव, जयंती उत्सव, लग्न समारंभ, तसेच सार्वजनिक, सामाजिक व राजकीय कार्यक्रमादरम्यान होणारे विविध प्रकारचे ध्वनिप्रदूषण, कर्णकर्कश्य ध्वनिवर्धके, लेझर शो, फटाक्यांचा वेळोवेळी होणारा अतिरेकी वापर तसेच सार्वजनिक रस्त्यांवर मंडप टाकल्याने वाहतुकीस निर्माण होणारे अडथळे टाळण्याबाबत विविध संघटनांद्वारे जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले.

जिल्ह्यात सर्व धर्मांचे सणोत्सव तसेच विविध सार्वजनिक कार्यक्रम शांततापूर्ण, सामाजिक सलोखा जोपासत व नियमांचे पालन करून साजरे व्हावेत आणि नागरिकांना कोणताही त्रास न होता सर्वांनाच उत्सवांचा आनंद घेता यावा, या उद्देशाने सदर निवेदन देण्यात आले.

सुमारे ६०० जागरूक व संवेदनशील नागरिकांच्या सह्या असलेल्या या निवेदनात सर्वच प्रकारच्या आयोजनाबाबत जिल्हा प्रशासनाने संबंधितांना पूर्वसूचना द्याव्यात व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. रस्त्यांवरील अतिक्रमण व अडथळ्यांमुळे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण तसेच सर्वसामान्यांना होणारा त्रास टाळण्यासाठी आयोजकांनीही सहकार्य करण्याचे आवाहन सामाजिक संघटनांद्वारे करण्यात आले आहे.

निवेदन देताना विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी जिल्हा पोलीस अधीक्षक आणि निवासी जिल्हाधिकारी यांच्याशी सर्वांच्या न्यायालयाचे निर्देश तसेच लागू असलेल्या कायदे व नियमांचे काटेकोर पालन करण्याबाबत सविस्तर चर्चा केली. संबंधित नियमांचे पालन करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल आणि कायद्याची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल, असे आश्वासन प्रशासनाद्वारे देण्यात आले. यावेळी भारतीय लोकशाही अभियानाच्या सदस्यांसह आनंद निकेतनच्या संचालिका सुषमा शर्मा, सत्यशोधक समाजाच्या प्रा. नूतन माळवी, अ.भा. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष हरिष इथापे, बहार नेचर फाउंडेशनचे अध्यक्ष संजय इंगळे तिगांवकर, किसान अधिकार अभियानचे मुख्य प्रेरक ॲड. अविनाश काकडे, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य कार्यकारिणी सदस्य ॲड. पूजा जाधव, अ.भा. ॲनिसच्या महिला शाखा जिल्हा सचिव पल्लवी पाटोदेकर बोदिले, पुरोगामी कार्यकर्त्या द्वारका इमडवार, ऋतुजा भोयर, लक्ष्मी लिंगडे, श्री. लिंगराज कट्टाचे ॲड. कपिलवृक्ष गोडघाटे, ॲड. निखिल बुरबुरे, आम्ही वर्धेकरच्या ओजस सुवि, प्रा. सुनील अंभोरे यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, प्रतिनिधी व जागरूक नागरिक उपस्थित होते.

प्रवाशांच्या सेवेसाठी एसटीचा ताफा अधिक सक्षम होणार – परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई : महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील सर्वसामान्य प्रवाशांच्या जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या एसटी अर्थात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी, दर्जेदार आणि विश्वासार्ह सार्वजनिक वाहतूक सेवा देण्याच्या उद्देशाने एसटी महामंडळाने बसताफ्याच्या विस्तारासोबतच आधुनिकीकरणाला वेग दिला आहे. नव्या बसेसच्या माध्यमातून एसटीची सेवा अधिक सक्षम करण्याचा संकल्प करण्यात आला असून, त्याच दिशेने पाच हजार 'लालपरी' बसेससचा खरेदीची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

या निविदा प्रक्रियेत सर्वात कमी दराचा देकार टाटा मोटर्सस्मारख्या नामांकित आणि विश्वासार्ह संस्थेने सादर केला आहे. त्यामुळे बसेसच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा विश्वास मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

मंत्री श्री. सरनाईक म्हणाले की, नव्या पाच हजार 'लालपरी' बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल झाल्यानंतर ग्रामीण महाराष्ट्राची 'लोकवाहिनी' असलेल्या एसटीला मोठी बळकटी मिळणार आहे. नव्या बसेसमुळे जुन्या बसेसवरील ताण कमी होईल, बसफेऱ्यांची उपलब्धता वाढविणे शक्य होईल आणि प्रवाशांना अधिक चांगली सेवा देता येईल. जुन्या व गळक्या बसेस तसेच प्रवासादरम्यान बसेस बंद पडण्याच्या समस्येवरही नव्या ताफ्यामुळे प्रभावीपणे मात करता येणार आहे. पुढील सहा महिन्यांत सुमारे पाच हजारांहून अधिक जुन्या बसेस प्रवासी सेवेतून कालबाह्य होणार आहेत.

एसटी महामंडळाने यापूर्वीच बसताफ्याच्या आधुनिकीकरणाला सुरुवात केली आहे. २ बाय २ आसन व्यवस्थेच्या २,६४० 'लालपरी' बसेस ताफ्यात दाखल झाल्या आहेत. त्याचबरोबर ३ बाय २ आसन व्यवस्थेच्या तीन हजार 'राजमाता जिजाऊ' बसेस ताफ्यात दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. नव्या बसेसच्या समावेशामुळे एसटीचा ताफा अधिक तरुण, सक्षम आणि प्रवाशांच्या गरजांशी सुसंगत होत आहे. नव्या पाच हजार बसेस ताफ्यात दाखल झाल्यानंतर 'मागेल त्याला बसफेरी' उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. बसफेरीचा फायदा झाला नाही तरी चालेल; मात्र बसफेरीची मागणी करणाऱ्यांनी तीन फेरी तोट्यात चालणार नाही, याची हमी घ्यावी, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

विशेष म्हणजे, पाच हजार 'लालपरी' बसेसचा हा टप्पा एसटीच्या पारंपरिक डिझेल बसच्या युगातील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. यानंतर पर्यावरणपूरक ई-बसेसच्या दिशेने एसटी महामंडळाचा प्रवास अधिक वेगाने सुरू होणार आहे. त्यामुळे प्रवाशांना आधुनिक वाहतूक सुविधा उपलब्ध करून देतानाच पर्यावरण संवर्धनालाही प्राधान्य मिळणार आहे. लाखो नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाची विश्वासू सोबती असलेल्या एसटीच्या ताफ्यात होणारी ही मोठी भर म्हणजे केवळ बसेसची संख्या वाढविणे नव्हे, तर प्रवाशांच्या सुरक्षित, सुखकर आणि दर्जेदार प्रवासाला नवी दिशा देणारे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. 'प्रवाशांच्या सेवेसाठी' हे ब्रीद अधिक प्रभावीपणे साकार करण्यासाठी एसटी आता नव्या दमाने, नव्या तंत्रज्ञानासह आणि पर्यावरणपूरक भविष्यासाठी सज्ज होत आहे, असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

राज्यकार्यकारिणीत सादर केला वर्धा जिल्ह्याचा अहवाल..



राज्य कार्यकारिणीत गजेंद्र सुरकार यांचा केला सत्कार

वर्धा : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची दोन दिवसिय राज्य कार्यकारिणी नुकतीच दि १२,१३ सप्टेंबर शनिवार रविवार रोजी मानवलोक संस्थेच्या सभागृहात अंबेजोगाई जि बिड येथे पार पडली यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा वर्धा शाखेचा अहवाल राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार पत्रिकेच्या यांनी ७ जुन ते ११ सप्टेंबर २६ पर्यंतचा राज्य कार्यकारिणी सभेत सविस्तरपणे मांडला तर समारोपीय कार्यक्रमात महाराष्ट्र भुषण सम्मान पुरस्कार प्राप्त कार्यकारिणीच्या सदस्य राज्य कार्यकारिणीच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी मंचावर राज्य कार्याध्यक्ष प्रा संजय बनसोडे सांगली,राज्य अध्यक्ष मा माधव बावरे,लातूर,राज्य प्रधान सचिव विनायक सावळे शहादा,मा डॉ ठकसेन गोराणे, नाशिक,विजय परब, मुंबई प्रामुख्याने उपस्थित होते याप्रसंगी अहवाल मांडतांना गजेंद्र सुरकार यांनी वर्धा शहरातील शाळा महाविद्यालये ,ग्रमिण भागात राबविण्यात आलेले कार्यक्रम उपक्रम,तसेच आर्वि आष्टि कारंजा हिंगणघाट,सेलू देवळी समुद्रपुर या शाखाव्दारे राबविण्यात आलेले कार्यक्रम उपक्रम, अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचे सभासद नोंदणी,सदस्य नोंदणी नियमित शहर शाखा बैठक,जमा केलेल्या देणगी जाहिराती आदींची सविस्तर माहिती दिली व पुढील चार महिण्यात कोणकोणते उपक्रम, कार्यक्रम राबविण्यात येणार आहे याचे विवेचन केले तिन दिवस चाललेल्या या राज्य कार्यकारिणीत वर्धा शाखेच्या उत्कृष्ट अहवालाची नोंद घेण्यात आली या राज्य कार्यकारिणीला ३० जिल्ह्यातील १०० च्या वर कार्यकर्ते उपस्थित होते आलेल्या जिल्हा कार्याध्यक्ष व प्रधान सचिव यांनी अहवाल व संघटनात्मक संरचना जबाबदारी याबाबत पुढील चार महिण्याचा अहवाल सांगितला तर २३ विभागाच्या राज्य कार्यवाह राज्य कार्यवाह यांनी आपल्या विभागाचा अहवाल सादर केला राज्य कार्यकारिणीला स्थानिक शाखेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

मृतदेहावर लवकर अंत्यसंस्कार करावे ; जिल्हा प्रशासनाचे आवाहन

पीडित शेतकरी कुटुंबातील व्यक्तींना योग्य मदत देण्यासाठी प्रशासनाचा पुढाकार

वर्धा : जिल्ह्यातील रायपूर जंगली शिवारात वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू झाला. घटनेला पाच दिवसांवर कालावधी होत आहे. मात्र अंत्यसंस्कार झालेले नसून मृतदेह शवागारात आहे. प्रशासनाकडून स्थानिक समिती, गावकरी, सामाजिक संघटना, नातलग, कुटुंबियांशी संवाद साधण्यात येत आहे. प्रशासन पीडित कुटुंबियासोबत आहे. सतत पाठपुरावा करत चर्चा करण्यात येत आहे. मागण्यांबाबत प्रशासनाच्या वतीने नियमानुसार कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. तसेच इतर मागण्यांबाबत शासनाकडे माहिती पाठविण्यात आली आहे. मृतदेहावर लवकर अंत्यसंस्कार करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात पत्रकार परिषद पार पडली. यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी., पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल,



उपविभागीय अधिकारी कुश मोटवानी, बोर अभयारण्याचे उपसंचालक मंगेश ठेंगडी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजसिंह पवार, सहाय्यक वनसंरक्षक दत्तात्रय लोंढे, तहसीलदार डॉ. शकुंतला पाराजे यांची उपस्थिती होती. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात येणार आहे. मृतदेहावर अंत्यसंस्कार करून घ्यावे. मागण्यांसंदर्भात चर्चा त्यानंतरही करता येईल. प्रशासन याबाबत संवेदनशिल आहे. मागण्यांबाबत शासनाकडे माहिती पाठविण्यात आली आहे. पालकमंत्री, खासदार, लोकप्रतिनिधींना माहिती देण्यात आली आहे. वनविभागाकडून एकास हंगामी कामाचे आश्वासन देण्यात आले आहे. शासनाच्या नियमानुसार आर्थिक मदत देण्यात येणार आहे. मृतकाच्या वारसाला बचतगटाच्या माध्यमातून जिप्सी वाहनाबाबत विचार आहे. याबाबत कुटुंबिय, सरपंच, ग्रामस्थ, नेते यांच्याशी चर्चा सुरू आहे. सकारात्मक तोडगा निघेल, असा आशावाद जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी व्यक्त केला.

-- सेलू तालुक्यातील रायपूर जंगली शिवारात शेतकरी भगवान धुर्वे यांचा ९ सप्टेंबर रोजी वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला. या घटनेस पाच दिवसांचा कालावधी होत असताना अंत्यसंस्कार झालेले नाही. मृतदेह शवगारात आहे. नातेवाईकांसह गावकरी त्यांच्या मागण्यांवर ठाम असल्याचे चित्र आहे.

घटनेनंतर तातडीने प्रशासन घटनास्थळी पोहोचले. दुसऱ्या दिवशी शवविच्छेदनानंतर मृतदेह रायपूर येथे नेण्यात आला. अंत्यसंस्काराकरिता कुटुंबियांना अर्थसहाय्य देण्यात आले. त्यानंतर गावकरी आणि परिवाराने अंत्यसंस्कारास नकार दिल्याने मृतदेह शवागारात ठेवण्यात आला. पीडित परिवाराला १ कोटींची मदत, सदस्याला शासकीय नोकरी, गावाचे पुनर्वसन आदी मागण्या करण्यात आल्या. सर्वांची समजूत काढण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. परिसरात ट्रॅप कॅमेरे लावले. वनविभागाकडून गस्त वाढविण्यात आली आहे. शेताचे रस्ते मोकळे करून देण्यात येत आहे. मागण्यांचा अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे. असे बोर अभयारण्याचे उपसंचालक मंगेश ठेंगडी यांनी सांगितले.

समिती अडचणी जाणून घेत उपायांची सुचविल्या जाणार असल्याचे उपविभागीय अधिकारी कुश मोटवाणी यांनी सांगितले. मृतदेहाचा बाह्य वातावरणाशी संपर्क आला आहे. मृतदेह ७२ तासांपर्यंत व्यवस्थित राहू शकते. त्यामुळे मृतदेहावर तातडीने अंत्यसंस्कार करणे आवश्यक असल्याचे यावेळी जिल्हा शल्य चिकीत्सकांनी सांगितले.

कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याची काळजी घेतली जाणार असल्याचे पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांनी सांगितले.